# प्रकरण-४

# वकिल्या पारधी व दैना कादंबरीचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन

# प्रकरण-४

# वकिल्या पारधी व दैना कादंबरीचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन

साहित्य अथवा कलाव्यवहार मानवी जीवनाला केंद्रवर्ती ठेवून उदयास आलेला असतो. तो समाज-जीवन, रूढ तत्त्वज्ञान, आचार-विचार आणि संस्कारांनी परिपूर्ण झालेले असते. समाज जीवनातील नीती-नियमांची रूढ चौकट सामाजिक व्यवहाराच्या सुखकारकतेसाठी संक्रमित होत असते. विशिष्ट काळात रूढ झालेले जीवनविषयक तत्वज्ञान वर्तमानकाळात जाचक ठरण्याची शक्यता असते.जीवनविषयक तत्त्वज्ञानातील हे आंतरद्वंद्व साहित्य अथवा कलानिर्मितीसाठी प्रेरक ठरते. त्यामुळेच कलाकृती म्हणजे जीवनाची अनुकृती किंवा जीवनभाष्य होय. अशी पाश्चात्य अभ्यासकांनी मांडलेली साहित्यविषयक व कलाविषयक भूमिका यादृष्टीने महत्त्वाची ठरते. साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधांचा विचार करता साहित्य म्हणजे सामाजिक अनुभवांची व जाणिवांची अभिव्यक्ती होय. 'साहित्याचा अंकुर भोवतालच्या जीवनातीलच असतो. समाज जीवनापासून वेगळी अशी अनुभूती असूच शकत नाही. ती अनुभूती सौंदर्यदर्शन, दु:ख अथवा शृंगाराची असो. ती भोवतालच्या समाजात निर्माण झालेली असते. म्हणूनच साहित्य आणि समाजाचा अनुबंध स्पष्ट करताना फ्रेंच समीक हिपॉलाइट तेन यांनी वंश, काळ, आणि परिस्थिती याला साहित्यामध्ये महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. किंवा साहित्य आणि समाज यांचा अनुबंध मान्य करणारी पहिली व्यक्ती म्हणून तेनचा निर्देष केला जातो. मराठी भाषेमध्ये डॉ. सदा कऱ्हाडे यांनी साहित्य आणि समाज यांतील संबंध स्वाभाविक असतात, अशी मांडणी केलेली आहे. त्यासंदर्भात त्यांची भूमिका अशी की, ''साहित्य आणि समाज यांतील संबंध प्राचीन आहेत तसेच ते ऐतिहासिकही

आहेत. इतिहासाच्या भौतिकवादी प्रक्रियेत त्या संबंधात बदलही होतो. म्हणून एका अर्थी हे संबंध परिवर्तनीय असतात. अनिश्चित व प्रश्नात्मक असतात. 'कलावंत मूर्त मानवी वस्तू' असतो. कालमानानुसार समाजात जो सांस्कृतिक बदल होतो. त्याचा परिणाम मनो:मय जीवनावर होतो. समाजातील मूल्ये व आदर्श बदलतात. परंपरा आणि नवता यांच्या द्वंद्वात्मकतेतून परंपरेचाही विकास होतो. परिवर्तनाच्या अनुरोधाने कलावंतही बदलतो. जीवनाकडे बघण्याची त्याची दृष्टी बदलते.''[१]

साहित्य निर्मात्याला सामाजिक सुख-दु:ख, जीवनाविषयीची विविध अनुभूती, परंपरा आणि रूढी यांचा सर्वांगीण अभ्यास असल्यास साहित्यकृती अधिक सकस अथवा दर्जेदार होऊ शकते. साहित्य आणि समाज यांचा अनुबंध विचारात घेऊन 'वकिल्या पारधी' आणि 'दैना' या कादंबऱ्यांचे मूल्यमापन करताना या दोन्हीही कादंबऱ्यांमध्ये सामाजिक अनुबंध अथवा सामाजिक दु:खाची मांडणी करण्यात हे कादंबरीकार कितपत यशस्वी झाले याचा शोध घेतल्यानंतर अनुभवास येऊ शकेल. वकिल्या पारधी आणि दैना या दोन्ही दलित साहित्यातील महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. दलित कादंबरी प्रामुख्याने सामाजिक वेदना, सामाजिक दु:ख, दारिद्र्य, भोगावी लागलेली गुलामी यांची मांडणी करून सामाजिक अन्यायाच्या विरोधात मानवतावाद आणि न्यायाची मांडणी करते. त्यामुळे या दोन्ही कादंबऱ्या विमुक्त जातीच्या विविध समस्येशी निगडित आहेत. त्या समस्या मांडण्यामध्ये हे कादंबरीकार कितपत यशस्वी झाले याची शहानिशा करता अधिक स्पष्ट होईल.

**वकिल्या पारधीचे सामाजिक मूल्यमापन :-**

'वकिल्या पारधी' ही कादंबरी गुन्हेगार समजलेल्या पारधी समाजाच्या जीवनावर आधारित आहे. या कादंबरीचे लेखक लक्ष्मण गायकवाड वहीम ठरवल्या गेलेल्या अशाच गुन्हेगार जमातीतील आहेत. 'उचल्या' या आत्मकथनाद्वारे त्यांनी प्रथमत: गुन्हेगार जमातीच्या दु:खद जीवनाचा सांगोपांग विचार केलेला आहे. त्याचबरोबर

पुढील काळात त्यांनी सदरच्या विमुक्त जातींना न्याय हक्क प्रस्थापित करून देण्यासाठी चळवळी आणि प्रत्यक्ष सहभाग नोंदविला आहे. त्यामुळे लक्ष्मण गायकवाड यांना सामाजिक प्रश्नांची जाण असल्यामुळे या कादंबरीतून व्यक्त झालेल्या सामाजिक समस्या पारधी समाजाचा एकूण जीवन व्यवहार शब्दांकित करणारी आहे. त्या समस्यांची मांडणी सदर कादंबरीत पुढीलप्रमाणे आलेली आहे.

१. सवर्ण लोक आपल्या वैयक्तिक शत्रुत्वाचा बदला घेण्यासाठी पारधी लोकांचा उपयोग करून घेताना दिसतात. उदा- बाजीराव देशमुख हे जमिनदार स्वहितासाठी पारधी लाकांची पोलिसांपासून सुटका करतात. व निवडणूकीमध्ये आपला पराभव करणाऱ्या नानासाहेब पाटलाशी पूर्वीचे वैर काढण्यासाठी बिरडीस या पारधी व्यक्तिला 'तुम्हा पारध्यांची हिंमत आणि माझा पाठींबा एक करून तेवढा नानासाहेब पाटलांच्या वाड्यावर डाका कसा घालता येईल' असा प्रश्न विचारून दरोड्याची कामगिरी त्याच्यावर सोपवतात. तसेच त्या पाटलाच्या शेतातील माल चोरून स्वत:च्या शेतात आणून टाकण्याचा आदेशही ते पारध्यांना देतात.त्यामुळे गावच्या जमिनदाराचाच चोरीसाठी पाठींबा असल्यामुळे पुढे पारधी लोक अनेकांच्या शेतातील धान्याची चोरी करण्यास प्रवृत्त होतात. (पृ.९६)

२. जन्मजात गुन्हेगारीचा शिक्का बसलेले पारधी लोक पूर्वी पोलिसांच्या गाडीचा आवाज ऐकून पळून जात असत. तसेच दारूव्यवसायही लपून-छपून करत असत. पण पुढे पारधी लोक जमिनदार देशमुखांच्या सल्ल्याप्रमाणे दरोडा घालून त्यांच्या आश्रयाखाली राहू लागतात. तसेच देशमुखांच्याच नात्यातील पोलिसांना दारूधंद्याचे हप्ते वेळीच देऊन त्यांना खूश करतात. त्यामुळे पोलिसांना घाबरून पळून जाणारे हे लोक पुढे त्यांच्याच आश्रयाने आनंदाने जीवन जगताना दिसतात. (पृ.११४)

३. पोलिस यंत्रणा जाणिवपूर्वक पारध्यांचा छळ करून स्वत:ला बढती मिळवण्यासाठी त्याचा उपयोग कसा करून घेतात, याचे वर्णन या कादंबरीत आलेले

आहे. उदा- शेरखान या व्यक्तीची प्रगती गावातील श्रीमंत लोकांना खुपते, त्यामुळे ते लोक त्याच्या घरी चोरीचा माल ठेऊन त्याला पोलिसांकरवी पकडून देतात. चोर, डाकू म्हणून त्याची वृत्तपत्रातून विटंबना करतात व गुन्ह्याच्या कबुलीसाठी त्याचा अतोनात छळ करतात. त्यामुळे पोलिसांना बढती मिळते. तेथून पुढे पोलीस बढतीसाठी खोट्या नोंदी करण्यावर भर देताना दिसून येतात. (पृ.१२४-१२५)

४. पोलिस लोक पैशाच्या मोहामुळे कसे विकले जातात ते दिसून येते. उदा- बादशहा पारधी हा खतरनाक दरोडेखोर पोलिसांची गाडी अडवून पोलिस ड्रायव्हरच्या मदतीने दरोडा घालतो व त्यामध्ये मिळालेला काही वाटा पोलिसांना देतो व म्हणतो, 'अशीच पुन्हा नजर आमच्यावर असू देत' आणि फौजदारही तो वाटा पोलिसांमध्ये वाटून झाकली मूठ सव्वा लाखाची असे म्हणून गप्प राहणे अधिक पसंद करतो. (पृ.१५२)

५. चोरीचा माल विकत घेणाऱ्या व्यक्ती अथवा व्यापारी पारधी लोकांच्या अडाणीपणाचा फायदा तर घेतातच पण त्यांना पोलिसांपासून संरक्षणही देतात. उदा- पारध्यांकडील चोरीचे दागिने घेणारे बाबुलाल सेठ हे पोलीस किंवा अनोळखी व्यक्ती दिसणार नाही याची खात्री करून गुपचूप दागिने घेतात व त्याऐवजी पायली दोन पायली ज्वारी, डाळ, मीठ, तेल व थोडे पैसे देऊन म्हणतो, 'तुम्हा लोकांचं हे चोरीचं सोनं माझ्याबिगर कुणीही घेत नाही. बिना पावतीचपाटीचं मी तुझं सोनं घेतोय पण ही गोष्ट कुठेही होऊ देऊ नकोस.'(पृ.१५४)

६. हातभट्टीची दारु व देशी दारूच्या व्यवसायासंबंधी केला जाणारा पक्षपात याचे वर्णनही कादंबरीत आले आहे. सवर्ण लोकांच्या देशी दारूसाठी सरकारी परवाना मिळतो. साखर कारखान्याचे चेअरमन पतंगराव पाटील हे कारखान्यातील मळीपासून दारू तयार करतात. ही दारू आरोग्यासाठी हानिकारक असूनदेखिल त्याला कायदेशीर परवाना मिळतो पण पारधी लोकांची दारू बंद करण्यासाठी त्यांच्यावर

दबाव आणला जातो. त्यामुळे पारधी- लमान लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न या कादंबरीत मांडलेला आहे. (पृ.१३१)

७. स्वातंत्र्योत्तर कालखंडात जंगलाच्या नव्या कायद्यामुळे पारधी लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. आणि यातून मध्यममार्ग म्हणून ते वाईट मार्गाकडे वळतात. उदा. नव्या कायद्यानुसार जंगलातील प्राण्यांची शिकार करणे, झाडे तोडणे हा गुन्हा मानला गेल्यामुळे 'आता काय खायचं आणि कसं जगायचं?' असा प्रश्न पारध्यांना पडतो. म्हणून ते चोरीचा मार्ग अवलंबून आपली भूक भागवताना दिसतात. (पृ.६३)

८. इंग्रज अधिकाऱ्यांच्या प्रगतीमध्ये आदिवासी लोकांचा अडसर झाल्यामुळे 'जन्मत: गुन्हेगार जमात' असे संबोधून त्यांचा क्रूरपणे छळ केल्याचे वर्णन कादंबरीत येते. उदा. इंग्रजांना जंगलातून रेल्वेमार्ग तयार करायचा असतो. पण त्यामध्ये जंगलातील आदिवासी लोकांचा त्यांना अडथळा होतो. म्हणून ते आदिवासी लोकांना कायद्याने गुन्हेगार ठरवून तारेच्या कुंपनात डांबतात व दिवसभर रेल्वेमार्गाचे काम आणि त्यानंतर कापड गिरणीमधील काम लावून रात्री हजेरी घेणे व कामचूकारपणा करणाऱ्याला साखळदंडाने मारून ओझे वाहायला लावणे अशा प्रकारच्या अघोरी शिक्षा करत. (पृ.४१)

९. पोलीस लोक निरपराध पारधी लोकांची हत्या करून ती कशी पचवतात याचा प्रत्यय पुढील उदाहरणावून येतो. उदा. तारेच्या कुंपनातून पळून गेलेल्या पारध्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस पारधी वस्तीवर येतात. वाघआवळ्या ही व्यक्ती त्यांच्या हाती लागते तेव्हा पोलीस त्याचा क्रूरपणे छळ करून जिवे मारतात आणि त्याच्यावरच उलटवून म्हणतात की,' हरामखोर चोरी केलेलं ठिकाण दाखवतो म्हणून आम्हाला बाहेर काढलं आणि गाडीतून उडी मारून पळून गेला.' असे म्हणून ते प्रकरण दडपून टाकतात.

१०. गरिबांना न्याय देणारी देवता देखिल कशी भ्रष्ट होते याचे उदाहरण या कादंबरीमध्ये आलेले आहे. समस्त गावकरी पोलिसांच्या संगनमताने पारधी हत्याकांड घडवून आणतात. त्याच्या निकालाच्या आधी एक दिवस गावातील श्रीमंत लोक पैशाच्या हव्यासापोटी न्यायाधिशांना भ्रष्ट करतात. आणि "पारध्यांच्या आपापसातील दूश्मनीमुळे हा हत्याकांड घडला" असा निकाल न्यायाधिश देतात. (पृ.२३३-२३४)

११. पारधी स्त्रियांची होणारी विटंबनाही या कादंबरीत मांडली आहे. विशेषत: पारध्यांमधेच मुलगा-मुलगी असा भेद केल्याचे दिसून येते. उदा. मालनबाई या स्त्रीला तिनही मुलीच झाल्यामुळे तिचे सासू-सासरे व नवरा तिला त्रास शिव्या-श्राप देत असतात. या त्रासाला कंटाळून मालनबाई आपल्या मुलीची हत्या करते आणि प्रेत उकीरड्यात पुरते. ही गोष्ट पोलिसांना समजताच तिला मुलीच्या खुनाची शिक्षा मिळते. (पृ.२१७)

१२. पोलिस लोक आपल्या वरिष्ठांना खुश करण्यासाठी गरीब पारधी स्त्रियांचा उपयोग करून घेताना दिसतात. उदा. औरंगाबादचे नवीन पोलीस अधिकारी उस्मानाबादला येतात. व त्यांना खुश करण्यासाठी पारध्यांच्या तरून मुली जबरदस्तीने नेऊन त्या वरीष्ठांच्या पुढे भेट म्हणून देण्यात येतात. पण त्यामुळे त्यांची अब्रू लुटल्यामुळे त्यांना शुद्ध करून घेण्यासाठी जमातीत जात-पंचायत पडते. (पृ.२३४-२३५)

१३. पारधी कूटुंबामध्ये सुंदर मुलगी जन्माला येणे हा देखील पोलिसांच्या दृष्टीने गुन्हाच ठरतो. उदा. रहीमान्या या पारधी व्यक्तीची लहान मुलगी गोरी सुंदर आणि निटनेटकी असल्यामूळे पोलीस 'ही एवढी सुंदर गोरी पोरगी तूमच्या पारधी समाजात कूठून आली?' असे म्हणून तिला घेऊन जातात आणि खात्री पटल्यानंतरच परत

देतात. पण असा प्रसंग उद्‌भवल्यामुळे पारधी लोक पुढे खबरदारी घेताना दिसतात. (पृ.१८२)

१४. पारधी लोकांच्या स्थिरत्वामध्ये अडथळे आल्यामुळे त्यांच्या प्रगतीचे स्वप्न भंग पावते. उदा. बिरडीस ही पारधी व्यक्ती गावकऱ्यांप्रमाणेच शेती करण्याचा विचार करते तेव्हा गावकरी विरोध करतात. त्यामुळे गावचे जमीनदार त्यांना म्हणतात की,' तुम्ही पारधी लोक या गावाचे कायमचे रहिवासी नाहीत त्यामुळे गावकरी लोक तुम्हाला विरोध करत आहेत.' जमीनदाराने असे म्हटल्यावर पारध्यांची अपेक्षा बारगळते. (पृ.४७)

१५. ग्रामीण भागामध्येही अस्पृश्यता पाळली जाते. उदा. बिरडीस ही पारधी व्यक्ती जमीनदार देशमुखांच्या बोलविण्यावरून येते तेव्हा त्यांना असे दिसून येते की, या गावातील नियम खूपच कडक आहेत. कारण 'गावातल्या लोकांनी आपल्या घागरी भरल्यानंतर म्हारा मांगांना पाणी द्यायचं, पण त्यांनी स्वत: कधीही पाण्याला शिवायचं नाही.' असा दंड गावकऱ्यांनी ठेवला होता. परंतु गावातील कुत्र्या-मांजरांनी पाणी पिलेले त्यांना चालते. (पृ.९२)

१६. शहरी भागामध्ये गरीब लोकांच्या दारिद्र्याचा फायदा घेतला जातो. उदा. रहिमान्या ही पारधी व्यक्ती मुंबईत एका गीडीकडून ठोकरली जाते. तेव्हा त्या गाडीचा मालक त्याला दवाखान्यामध्ये नेऊन त्याच्यावर उपचार करतो. व त्या बदल्यात त्याची किडणी काढून घेतो. ही गोष्ट त्याला खुप दिवसांनी समजते. तेव्हा तो डॉक्टरला याचा जाब विचारतो तर डॉक्टर त्याला सल्ला देतो की,' तुला मी हे पाच हजार रूपये देतो ह्या पैशातून काहीतरी कामधंदा कर. (पृ.२२८-२२९)

सामाजिक जीवनातील दाहक अशा घटनाप्रसंगांनी 'वकिल्या पारधी' ही कादंबरी साकारलेली आहे. माणूस म्हणून जगण्यासाठी धडपडणारा हा समाज पारंपरिक दु:खाच्या सतत आहारी गेलेला दिसतो. भारतीय समाजव्यवस्थेने नाकारलेले त्यांचे माणूसपण आणि इंग्रजांनी त्यांना गुन्हेगार ठरवून लादलेली बंधने यातून मुक्तता करण्यासाठी धडपडणाऱ्या पारधी जमातीची मानसिकता जिवंत रूपात मांडण्यामध्ये कादंबरीकार यशस्वी झालेला आहे. हा समाज जरी मुक्तीच्या मार्गाने वाटचाल करत असला तरी इतर उच्च जाती, पोलिस यंत्रणा आणि न्यायव्यवस्था कशी अडथळे आणते ही दुसरी बाजुही कादंबरीकाराने काही उपरोक्त घटनाप्रसंगांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे या समाजाची होणारी अवहेलना, अत्याचार, उपासमारी याला एकूणच समाजव्यवस्था कशी कारणीभूत आहे. या निकषापर्यंत या कादंबरीचा आशय मांडला गेलेला आहे.

**निसर्गवर्णन-**

पारधी जमातीचे निवासस्थान स्थायी नसून सतत भटकंती करणे हेच त्यांचे जीवनमान. मानवी वस्तीपासून दूर अथवा दूर्गम भागात आपले तात्पुरता निवारा असलेले पाल ठोकून वास्तव्य करतात. जंगल, दऱ्याखोऱ्यात आणि झाडाझुडपाच्या सान्निध्यात या मानवी समुहाला सतत राहावे लागते. सामाजिक अन्यायाने पीडीत असलेला हा समाज निसर्गाच्या सान्निध्यात एकरूप होऊन काही क्षण आनंदाचे अनुभवतो. या संदर्भातली काही वर्णने 'वकिल्या पारधी 'या कादंबरीत आलेली आहेत.त्यामुळेच अशा वातावरणांचा अविष्कार या कादंबरीत जागोजागी आलेला दिसतो. केतकीवन, केकताड, दंडकारण्य, शिंदवन, बाभळवन, सागवान, मोहाचे जंगल, इ. वणांचे वर्णन त्याचप्रमाणे आपल्या आरोग्यासाठी ते ज्या वनस्पतींचा वापर करत असत, त्यामध्ये दालचिनी, डोंगरी लवंग, कोकणी जायफळ, हरणाच्या

पोटातून निघालेली सुवासिक कस्तुरी, डिंक, मोहाचा मध, शिकेकाईच्या शेंगा, डोंगरी लवंगा, हातजोडी, पायापडी, मोहाची फुले, बिब्याची फुले, बिब्याच्या गोडंब्या यांचा समावेश होतो.

**शिकार –**

शिकार हाच पारधी जमातीचा प्रमुख व्यवसाय व उदरनिर्वाहाचे साधन असल्यामुळे निरनिराळ्या प्राण्याची शिकार करताना ते आढळतात. उदा–कस्तुरी हरण, बदक, टिटव्या, खडुळ्या, तितरे, वाघ घोरपडी, ससे, चितरे, पारवे, काळवीट, रेडा, लव्हरे यांच्या शिकारी करताना दिसतात. त्याचप्रमाणे बाभळीला टोचा मारून बाहेर निघालेला डिंक भाजून खाणे, मोहोळापासून मध काढणे आणि शिकारीसाठी हरणाच्या नसांपासून तयार केलेले फासे, बाण, तीरकामठे, भाले, घोड्याच्या केसापासून तयार केलेल फासे ते वापरत असत. शिकार करताना प्रण्याने आपणास पाहू नये म्हणून वनगाईच्या पोटाला चिकटून राहणे, तसेच आपल्या जातबंधूंना धोक्याचा इशारा देण्यासाठी उंच कठड्यावर चढून रेड्याच्या चामडीपासून तयार केलेला ढोल वाजविणे, शिकार करताना प्राण्यांनी आपणास चावू नये याची ते खबरदारी घेतात. शिकार करण्यासाठी पाळीव प्राणी म्हणजे कुत्रे, वनगाई पारध्यांना मदत करत असत.

**लग्नसमारंभ –**

पारधी जमातीमध्ये विवाह करताना पुरूषाने आपले शौर्य, सामर्थ्य आणि आपण आपल्या पत्नीचा सांभाळ करण्यास सक्षम आहोत हे दाखविण्यासाठी कोणत्याही उडणाऱ्या पक्षाला मारून त्याचे मांस होणाऱ्या पत्नीला खाऊ घालावयाचे असते. तेव्हाच त्या मुलीची खात्री पटते. अन्यथा ती मुलगी विवाह मोडूही शकते. रिवाजाप्रमाणे लग्नामध्ये ढोल–ताशा वाजवून नवरा–नवरी एकमेकाच्या गळ्यामध्ये

नागिलीच्या आणि पिंपळाच्या माळा घालतात. आणि हा विधी पार पडतो. याचे वर्णन (पृ.१२८) मध्ये आले आहे.

एखाद्या स्त्रीचा पती कोणत्याही कारणास्तव मरण पावला तर नियमाप्रमाणे तिचा विवाह थोरल्या दिराशी केला जातो आणि स्त्रीला पहिल्या लग्नातून मुक्त करण्यासाठी पहिल्या पतीने लग्नामध्ये दिलेला हुंडा दुसऱ्या पतीला परत करावा लागतो. आणि पत्नी मरण पावली असता पतीचा विवाह मेहूणीशी किंवा पत्नीच्या नात्यातील अन्य स्त्रीशी हुंडा न देता केला जातो. असा विवाह करताना स्त्रीने आपन पवित्र आहोत व या विवाहानंतरही पवित्र राहू असे आश्वासन देण्यासाठी उकळत्या तेलाच्या कढईतून पैसे काढावयाचे असतात. आणि त्यामध्ये ती यशस्वी झाली तरच जातपंचायतीच्या संमतीने त्यांचा गंधर्व विवाह लावला जातो. या स्वरुपाचे वर्णन या कादंबरीत (पृ.६१)मध्ये आलेले आहे.

**सण-उत्सव -**

पारध्यांचा सण म्हणजे म्हणजे त्यांची जत्राच असते. वकिल्या पारधी कादंबरीमध्ये दोन ठिकाणी जत्रेचे उल्लेख आलेले आहेत. एका ठिकाणी कोडीयारा देवीची यात्रा साजरी करण्यासाठी संपुर्ण जमात स्वच्छ स्नान करून देवीचा जयघोष करत, नाचगाणी करत, ढोल-ताशे यांच्या गजरामध्ये देवीला रेड्याचा बळी देतात. रेड्याचा बळी हा त्या जमातीचा प्रमुख देतो. त्या रेड्याचे उडणारे रक्त प्रसाद म्हणून प्राशन करून मांस एकमेकांना चारतात. (पृ.१३)

दुसऱ्या ठिकाणी दर तीन वर्षांनी या देवीची जत्रा वरीलप्रमाणेच नाचगाणे-खाणेपीणे करत साजरी करतात. याचे वर्णन कादंबरीमध्ये (पृ.१५६) मध्ये आले आहे.

**जात-पंचायत -**

पारधी जमातीत रिवाजाप्रमाणे जत्रेच्या दुसऱ्या दिवशी जात-पंचायत बसते. या जात-पंचायतीत जाती-जातींमधील भांडण-तंटे, समाजातील स्त्री-पुरुषांच्या तक्रारी, जात-पंचायतीचे निकाल हे सर्व होत असे. उदा-सावळया या पारध्याची समस्या अशी की तो जेलमध्ये असताना त्याची पत्नी दुसरा विवाह करते त्यामुळे तो म्हणतो की, आपण दिलेला हुंडा आपणास परत मिळावा किंवा पत्नीने आपल्याशी संसार करावा, दुसरी समस्या बारक्या या पारध्याची अशी की, तो जेलमधून सुटण्यासाठी त्याला पैशाची गरज असते. म्हणून आपलया पत्नीला तो एका व्यक्तिकडे गहाण ठेवतो व जेलमधून सुटून आल्यानंतर पत्नीला नेण्यासाठी येतो, तेव्हा तिला एक मुल झालेले असते. तेव्हा फक्त आपली पत्नी द्यावी असे तो म्हणतो. (पृ.१५७ -१५८)

यांसारखे अनेक प्रश्न जात पंचायतीमध्ये निकालात काढले जातात व पंचांनी दिलेला निर्णय सर्वांना मान्य करावा लागतो.

**पारधी लोकांची परंपरा -**

पारधी लोकांना परंपरेप्रमाणे कोडियारा देवीची यात्रा झाल्यानंतर अन्यत्र स्थलांतर करावे लागे, मूलभूत गरजांशिवाय इतर वस्तू किंवा धन यांचा संचय त्यांनी करू नये तसेच पारधी वस्तीवर पारध्यांशिवाय अन्य कोणतीही व्यक्ती येणे ही धोक्याची सूचना असे समजून त्या व्यक्तिवर हल्ला करायचा किंवा आपला पराभव होणार असेल तर लढत लढतच वनगाईवर बसून निघून जायचे अशी त्यांची परंपरा आहे.

**'वकिल्या पारधी' चे वाङ्मयीन मूल्यमापन :-**

वाङ्मयीन निर्मिती ही एक कला आहे. त्यामुळे कादंबरी या वाङ्मयप्रकाराची चिकित्सा करताना कादंबरीचे निवेदन, वातावरणनिर्मिती, कादंबरी लेखकाची शैली आणि भाषा या घटकांना महत्त्वाचे स्थान असते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार

सामाजिक वास्तवाशी निगडित असेल तर ते वास्तव जिवंत करण्यासाठी संबंधीत कादंबरी ज्या जीवनजाणिवांवरती आधाकरत असते त्या जीवनजाणिवा कल्पनारंजक वाटणार नाही अशा भाषेत कादंबरीकारांना मांडणी करणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर त्या समाजाची संस्कृती, परंपरा, रितीरिवाज, आचार-विचार, समजुती यातून या जीवनाची स्वतंत्र शैली अभिव्यक्त झालेली असते. वास्तववादी कलाकृती लिहिताना अशा जीवनशैलीचा अचूक अवलंब करणे अगत्याचे ठरते. म्हणजेच वास्तववादी कलाकृतीची मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराला संपूर्ण सामाजिक भान असणे अगत्याचे असते. व त्याचे प्रकटीकरण कादंबरीच्या निवेदनाद्वारे साकार करत असतो. पर्यायानेच त्यासाठी कादंबरीकाराला त्या सामाजिक समुहाच्या भाषेचा संपूर्ण बाज ज्ञात करून त्याची मांडणी करणे अगत्याचे ठरते.

वकिल्या पारधी ही कादंबरी उपेक्षित ठेवलेल्या व ज्यांच्यावरती गुन्हेगारीचा शिक्का मारलेला आहे, अशा पारधी जातीच्या जीवनजाणिवांवरती आधारित आहे. या कादंबरीचे लेखक अशाच एका गुन्हेगार जातीसमुहातील असून त्यांची ही कादंबरी पारधी जातीचे जीवन जिवंत रूपात साकार करण्यात यशस्वी झालेली आहे. त्याचा प्रत्यय त्यांच्या निवेदनातून, वातावरणनिर्मितीतून आणि भाषा शैलीतून घडत जातो. त्याचे सोदाहरण विवेचन पुढीलप्रमाणे

**कादंबरीतील निवेदन :-**

'वकिल्या पारधी' या कादंबरीचे निवेदन तृतीयपुरूषी असून त्या निवेदनाद्वारे कादंबरीतील घटनाप्रसंग, आशयविष्कार आणि व्यक्तिरेखा यांचे प्रत्यक्ष घडविलेले दर्शन महत्त्वाचे आहे. त्यांच्या निवेदनात सहजता जशी आहे त्याचप्रमाणे त्या निवेदनात चित्रात्मक अनुभूती देण्याची क्षमता आहे. वकिल्या पारधी कादंबरीत निसर्गाचे वर्णन करणारी शैली अपवादानेच येत. मात्र त्यातील शब्द प्रतिमांमुळे निवेदन प्रवाही आणि निसर्गाबद्दल मनात भावना निर्माण करणारे आहे. उदा- ''सूर्य

चांगलाच आपल्या कुशीतून निघून वाव दोन वाव वर आला होता. आपल्या प्रकाशाचे तेज किरण जमिनीपर्यंत वेगाने फेकत होता. त्याचा प्रकाश शिंदवनातील प्रत्येक वस्तूवर पडत होता.''(पृ.१७) तसेच

''सूर्य माथ्यावर आला होता. ऊन्हाच्या झळा झाडाच्या फांदीफांदीला चिरून बिरडीसच्या उघड्या अंगावर पडत असल्यान ऊन्हाचे चटके अधूनमधून लागत होते. डोंगराच्या माथ्यावरून पाझरत-पाझरत येणाऱ्या पाण्याच्या धारा जंगलाच्या मुळा नदीतून वाहत होत्या.'' या दोन निवेदनात वापरलेले शब्द अनुभवाला अधिक सजीव बनवतात. सूर्याचे कुशीतून निघणे, ऊन्हाच्या झळांनी फाद्यांना चिरणे इ.

पारधी जमातीशी संबंधीत अनेक प्रकारच्या प्राण्यांच्या शिकारीची वर्णने या कादंबरीत जागोजागी आढळतात. त्यामुळे वाचकांचे कुतूहल चाळवले जाते. तसेच प्रत्येक प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या मांसाच्या चवी आणि प्रत्येक प्राण्यास पकडण्याची तऱ्हा यामध्ये लेखकाचा स्वानुभव असल्याचा अंदाज येतो. उदा-'बिरडीसचा फासा बरोबर बारशिंग्याच्या शिंगामध्ये जाऊन अडकला. आणि काळविट्याच्या झटक्यासहित बिरडीस गाईवरून जमिनीवर आपटला. आपल्या शिंगात अडकलेला फासा सोडविण्यासाठी बारशिंगी काळवीट फाश्यासहित बिरडीसलासुद्धा फरफटत घेऊन जाऊ लागला.' (पृ.२) तसेच 'रानपळ्या आणि तीरमाऱ्या तर हरणाचं आख्खं डोकं धगधगत्या विस्तवात खुपसून भाजल्यानंतर ते बाहेर काढून त्याची कवठी फोडून मेंदू भाजलेलं ते रुचकर मांस अन् हाडं चघळून चघळून खाण्यात तल्लीन झाले होते.'(पृ.३२) तसेच 'इकडे मानकाप्यानं नदीच्या किनारी वाहून आलेल्या वसणाचे काटे, गवताच्या काड्या एकत्र करून ढीग रचले. वसणाच्या ऐचणाला चकमकीनं विस्तव पाडून मानकाप्यानं जाळ लावला. त्या जाळात वाम मासे आणि खेकडे टाकून खाली-वर करून त्याला भाजले.' (पृ.६६)



BARR. B. KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

घटनाप्रसंगाच्या वर्णनातील निवेदनातही तो प्रसंग डोळ्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य लेखकाजवळ असल्याचे दिसून येते. उदा-'आता उजडायला लागल्यामुळे सर्व काही स्पष्ट दिसत होतं. पारध्यांची सर्व माणसं जाळली. घरादाराला आगी लावल्या. पारध्यांच्या मदतीला कोणी धावून येत नव्हता. माती-पाणी टाकल्यानं काही अर्धवट जळालेली घरं शांत झाली.' (पृ.२१०) तसेच कादंबरीत आलेल्या जत्रेच्या वर्णनामध्ये 'जो तो कोडीयारा देवीच्या नावानं गरम गरम भात आणि रेड्याच्या शरीरातून उसळत येणारं गरम गरम रक्त पिण्यात दंग झाला होता. प्रत्येकाचं तोंड शिकार केलेल्या आणि रक्त प्यायलेल्या वाघासारखं लालभडक दिसत होतं. नाचगाणं, खाणंपिणं ह्यांची ह्या जत्रेत चंगळ झाली होती.'(पृ.१५६)
पारध्यांच्या दु:खी अवस्थेचे चित्रण करताना 'रडत, दु:खीकष्टी होत खाली ठेवलले मुडदे परत गाडी तठेवेले. प्रेतांना मरून दुसरा दिवस झाल्यानं त्या मुडद्यांना चांगलंच पाणी सुटून जिकडे तिकडे घाण वास येत होता. लिंबाचा पुष्कळ पाला आणून साऱ्या गाडीत भरला होता. मुडद्याचा वास आपल्या नाकात जाऊ नये म्हणून उदबत्त्यांचे पुडेच्या पुडे लावून मुडद्याच्या आजजूबाजूला धरच धूर केला.' (पृ.१९५) प्रत्येक वर्णन वाचणीय ठरविणारी निवेदनशैली या कादंबरीत सर्वत्र अनुभवास येते. उदा-'साऱ्या मुंबईचं जनजीवन ह्या पावसामुळे विस्कळीत झालं होतं. साऱ्या मुंबईच्या लोकलगाड्या बंद पडल्यानं माणसं एखाद्या सीमेवर अडकून पडल्यासारखी अवस्था झाली.लोक उपाशीतापाशी अडकले. जिथे सहारा मिळेल तिथे वडापाव खाऊन थांबले मुंबईची अवस्था अशी झाली होती.'(पृ.२३७) समुद्राच्या भरती-ओहोटीचा प्रसंग दारिद्र्यात वाढणाऱ्या माणसांची कशी धावपळ करायला लावतो याचे मार्मिक चित्रण या कादंबरीत येते. उदा-'समुद्राला ओहोटी सुरु झाल्यास लगेच झोपडपट्टीतील बायका, मुलं भगुली, ताटल्या, वाट्या घेऊन पळत जाऊन समुद्रातील त्या रेतीमध्ये पाण्यानं सोडून गेलेले शिंपले, गोगलगायी,

एका एका ठिकाणी तर रेतीमध्ये माना खुपसून पडलेली कासवं जो तो गोळा करून आपापल्या भांड्यात घेत होता. बकरीच्या भावाची मुलं, भावजय हेपण चुटूचुटू ताज्या ताज्या शिंपल्या,गोगलगायी गोळा करत होते.'(पृ.२३०)

जगण्यासाठी चाललेल्या धडपडीच्या निवेदनामध्ये 'रेड्याचं सर्व मटन एका जाळ लावलेल्या मोठ्या भांड्यात मीठमिरची टाकून शिजायला ठेवलं. पेटलेल्या तीन दगडांच्या चुलीवरती खापराची मडकी ठेवली होती. लालबूंद झालेल्या त्या मडक्यांवर जवाच्या पिठापासून हातावरच केलेल्या चपात्या हातानेच बायका मडक्यांवरती चिकटवून भाजून काढत होत्या.'(पृ.१५)

लक्ष्मण गायकवाड यांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखा त्यांच्या निवेदनशैलीमुळे जिवंत झालेल्या आहेत. उदा- बाजीराव देशमुखांची मग्रुर व्यक्तिरेखा चितारताना आलेले वर्णन असे 'बाजीराव देशमुख पांढरं शुभ्र धोतर, कमीज घालून मिशीला पीळ देत बैठकीत येऊन बसले' (पृ.८६) त्याचप्रमाणे बादशदहा या खतरनाक पारध्याची व्यक्तिरेखा चितारताना 'मिशांचे झुपकेच्या झुपके, काळासावळा रंग, आणि करडी नजर टाकून आपल्या पिंगळ्यासारख्या लाल तांबूस रंगाच्या बुबुळातून प्रत्येकावरती पाहण्याचा दरारा, माणसाला घायाळ करून टाकावा अशी त्याची नजर' (पृ.१४७) ही त्याची राकट आणि रांगडी व्यक्तिरेखा निश्चितच नजरेत भरते, तर इंग्रज सैनिकांचे वर्णन करताना 'ह्या गोऱ्या लोकांच्या डोक्यावर गोंड्याच्या टोप्या, पायात लांबच लांब बूट, दोघांच्याही अंगात रंगीबेरंगी सारखेच कपडे, पट्ट्याला बांधलेल्या लाकडाच्या पुढे बसवलेल्या लोखंडाच्या नळ्यांतून धुडूम धुडूम करणारी हत्यारं होती.' (पृ.१७) वकिल्याचे वर्णन करताना 'आईबरोबर चांगला पांढराशुभ्र शर्ट इन केलेला, बगळ्यासारखे कपडे घालून, टायबूट घालून एखाद्या इंग्रज अधिकाऱ्यासारखा खाडखाड चालत निघाला' (पृ.२३९) या सर्व वर्णनातून व्यक्तिरेखांचे सहज स्वभाव वैशिष्ट्ये प्रतिबिंबित झाले आहे.

कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये संवादांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्यक्तिरेखा जिवंत करण्याचे कार्य संवाद करतात. सदर कादंबरीतील असेच काही संवाद पुढीलप्रमाणे आहेत. बाजीराव देशमुखाचा गडी नामदेव कोळीचा संवाद 'आरं तुमच्या मायला, पारध्यांनो, तुम्हाला कोल्हे धरायला बोलावलंय का ऊस मोडून खायला?' (पृ.७६)तसेच घाडगे पाटील पोलिसांचा संवाद 'हरामखोर, पारध्याच्या माणसा, तू आम्हाला विचारण्याचं धाडस करतोस की आम्ही काय गुन्हा केला?'(पृ.८१) पारधी जमात ही गुन्हेगार समजल्यामुळे इतर समाजातील व्यक्ती त्यांच्याशी संवाद साधताना राकट व उर्मट भाषा वापरताना दिसतात. तर आपले दु:ख समजून न घेणाऱ्यांना पारधीही प्रेमळपणा दाखवित नाहीत उदा-'अरे कडूभाड्यांनो आम्ही काय गुन्हा केला आहे? कशासाठी आमच्यामागे हात धुऊन लागता? माझ्या लेकरानं तुमच्या सरकारचं काय खाल्लं?'(पृ.५२) शेवटी पारधी लोकांना त्यांच्यावर झालेले अत्याचार सहन होत नाहीत. तेव्हा ते न्यायाची याचना करतात दिसतात उदा-'साहेब, आम्हाला जनावरासारखं मारलं बघ. आता तूच काय ते साहेब, न्यायनिवाडा कर.'(पृ.१४१) पारधी जमातीची गुन्हेगारीची पार्श्वभूमी ज्ञात असतानाही ख्रिस्ती पाद्री गोन्साल्व्हिस त्यांना माणूस म्हणून प्रेमाने वागवितो. पुढील संवाद त्यांच्या प्रेमळपणाची साक्ष देतात. उदा-'बाळ, तू किती छान आहेस! तुझ्या या लहान वयामध्ये तुला किती काम करावं लागत!'(पृ.२२३) आणि या ख्रिस्ती पाद्रयाच्या प्रेमात वाढलेला वकिल्या या मुलाचे बदललेले भावविश्व पुढील संवादातून दिसून येते. 'माय, इथे माझ्यावर खूप प्रेम करतात. नवीन नवीन आल्यावर मला दात घासायचं, आंघोळ करायचं, वेळेवर जेवायचं, वेळेवर झोपायचं, हे सगळं फादरनी मला शाळेत आल्यावर शिकवलं.' (पृ.२२६) मानवतावादाचा प्रसंग गुलाब शेख या व्यक्तिच्या संवादातून अनुभवास येतो. उदा-'क्या यार, सभी इन्सान अल्ला के बंदे है। सभी यही पे पैदा होते है और सभी को

इस मिट्टी में जाना पडता है। तुम्ही आता बैलगाडी अशीच माझ्या शेतात तळ्याच्या पाळीला भरपूर मोकळी जागा आहे, तिथे न्या आणि खुशाल तुम्ही या मुडद्यांवर मुठमाती टाका. तिथं तुमहाला कोणी अडवणार नाही.'(पृ.१९६) धर्म आणि जातीपेक्षा माणूस महत्त्वाचा आहे हाच आशय या संवादातून प्रतित होतो.

वकिल्या पारधी कादंबरीची भाषाशैली नागरी असून मध्ये मध्ये ग्रामीणतेची झाक आढळते. जळन या पारधी स्त्रीचा संवाद उदा-'कडू मुडद्याणी पोलिस स्टेशनात आपल्या माणसाला लय मारलेलं दिसंतय.'(पृ.८७) तसेच संगितराव या मुलाचा संवाद 'आयला ह्यो सायब्या, तुम्ही तर पारधी आदिवासी हिंदू लोक असता. मग तुमच्यात हे नाव वकील गोन्सालीस कसं काय रे?'(पृ.२४१)

कादंबरीच्या मध्यार्थात पारधी भाषेतील संवादही आलेले आहेत. उदा- बिरडीस या व्यक्तिचा संवाद 'म्हं बावरिस, दुसरं कोई नसं' असे जेव्हा तो म्हणतो तेव्हा सारे पारधी 'बावनं आपलंस, बावनं आपंस असे म्हणून एकत्र जमतात. (पृ.१२२) तसेच बकरी आपल्या भावाला विचारते 'कहं तु बावरीच आपनं नाम रहिमान्या तो नाहीचं' तेव्हा भाऊ गलबलून म्हणतो 'म्हं बावरीचं तुमनं रहिमान्या. तुम कब मुंबई आवचं बकरी?'(पृ.२२७) पारधी लोक इतर पारधी लोकांना आपली ओळख पटवून देतात की, 'हमं पारधीछं बादशहा पारधीसं मिलनं आवचं. बहुत जरुरी काम छं. तुमची ओळख असेल तर आम्हाला मदत करा'(पृ.१४७) असे पारधी भाषा मिश्रीत संवाद क्वचीत आढळतात. उदा-'गेंड्या या व्यक्तिचा संवाद 'देखो आपनी बावरी छोरं आवाचं. आता तूच त्यांच्याशी बोलून घे.'(पृ.१४६)

'वकिल्या पारधी' या कादंबरीमध्ये अनेक उपमा लेखकाने अगदी सहजगत्या वापरलेल्या आहेत. त्यामुळे त्याची प्रतीकात्मकता वाढते. उदा-'एखाद्या मुंगीचे पाय ठेचून वारुळ मोडून टाकावं आणि मुंग्या सैरावैरा पळत जाव्या तशीच हालत पारध्यांचा संसार पोलिसांनी मोडून तोडून टाकल्यामुळे झाली होती.'(पृ.१४३)

तसेच 'अशा पावसात बकरी जेलवंतीला आपल्या साडीच्या पदराआड घेऊन जसा पारध्याच्या हातून सुटलेला ससा लपण्यासाठी कुठंतरी जागा शोधतो तशीच ती आडोशासाठी इकडून तिकडं पळत होती.'(पृ.२३७) 'दिवस मावळतीला जाऊन शेंदराचा लालबुंद गोळा गरगर फिरत आपला लाल तांबूस रंग बाहेर सोडत हळूहळू आपल्या कुशीत जात होता.'(पृ.१२७) एखाद्या अंगात आलेल्या खंडोबाच्या वारुसासारखं गडाबडा हातपाय हलवत डोक्याला झटके देत एखाद्या हरणासारख्या उड्या मारतच वाऱ्याच्या वेगानं गर्दीतून अचानकपणे रानपळ्यानं पळ काढला.'(पृ.१७९) त्याचप्रमाणे हरणासारख्या उड्या मारणारे पारधी, सशासारखा निपचीप, शेळीनं पाला खाल्ल्यासारखी वटवट, चार जोडे मारल्यासारखा चेहरा, शिवून टाकल्यासारखं तोंड, कोनाड्यात धूळ खात पडल्यासारखं जीवन, गोचूड चिकटल्याप्रमाणे रेड्याच्या पाठीला चिकटून बसणे. इत्यादी अनेक उपमा लेखकाने वापरलेल्या आहेत.

कादंबरीमध्ये लांब पल्लेदार वाक्ये आढळतात. उदा- 'पोलीस किंवा मोटरसायकल किंवा गाडी दिसली तर घरामध्ये बायका लेकरांना सोडून पुरुषमंडळी हरणाच्या वेगानं काळविटासारखी कावरीबावरी होऊन डोंगरमाथ्याखाली पाठीपोटावर कधी घसरत तर कधी उड्या मारत क्षणार्धात आपल्या वस्तीवर पोलीस येईपर्यंत गडप व्हायची आणि कुठल्यातरी दऱ्याखोऱ्यात, कोपऱ्यात सशा मांजरासारखी दडून बसायची '

प्रत्येक वाक्यामागे लेखक कारणमीमांसा दाखवतो, जेणेकरून वाचकांच्या मनात कोणतीही शंका राहू नये. उदा- पारध्यांनी चोरी करण्यामागील कारण, त्यांनी पोषाख बदलण्यामागचे कारण, शिकार करण्यामागचे कारण, पारध्यांनी पैसे व्याजदराने देण्यामागचे, गुन्हा कबूल न करण्याचे कारण इ.

'पारधी जमातीवर अन्याय का?' तसेच 'आम्ही काय गुन्हा केला आहे?' किंवा आम्हाला गुन्हेगार जमात असे का म्हणतात, याची कारणमीमांसा वारंवार आलेली आहे. तसेच गुन्हेगार म्हणून पाहण्याचा दृष्टिकोण समाजाने बदलावा यासाठी खटाटोप केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे लेखकाने पारधी जमातीतील व्यक्तिंच्या नावामध्ये जाणिवपूर्वक वेगळेपणा दाखविला आहे. आणि त्यामागची कारणेही लेखकाने स्पष्ट केले आहे. उदा-बिरडीस, बकरी, पीस्तुल्या, मानकाप्या, रानपळ्या, काडतुस्या, रायफल्या, जंगल्या, गेंड्या वाघआवळ्या, जळन, हरणी, गवत, मंगळी, बुधवारी इ. नामावली यामध्ये येतात.

जंगलातील अनेक औषधी वनस्पतींची माहिती यावरून लेखकाचे ज्ञान अधिक वाटते. उदा-'घोरपडी खाल्ल्याने कंबर मजबूत होते, पारवे खाल्ल्याने वात होत नाही, पानकुत्र्याचं मटन खाल्ल्यास महारोग होत नाही तसेच पारधी स्त्रिया गरोदर असताना कोणकोणत्या वनस्पती खातात याचीही माहिती कादंबरीकारांनी दिली आहे.

'वकिल्या पारधी' हे कादंबरीचे नाव सार्थ असेच वाटते. कारण पारधी लोकांचा नेहमी पोलीस, कोर्ट-कचेऱ्या यांच्याशी संबंध येत असतो. अशावेळी वकिलाला पैसे देणे व आपली सुटका करून घेणे हे ओघानेच येते. त्यामुळे पारधी जमातीतील रानपळ्या हा आपल्या मुलाचे नाव 'वकिल्या' ठेवतो. व त्याला शिकवून मोठा वकील करून आपल्यावरील अन्याय त्याने दूर करावा अशी इच्छा बाळगतो. पारधी जमातीच्या इच्छांची पूर्ती या कादंबरीच्या माध्यमातून होते. वकिल्या पारधी हे शीर्षक त्यांच्या इच्छापूर्तीचे एक प्रतीक ठरते.

**दैना कादंबरीचे सामाजिक व वाङ्मयीन मूल्यमापन :-**

दैना आणि वकिल्या पारधी या दोन्ही कादंबऱ्या पारधी जमातीच्या जीवनानुभवावर आधारित असल्या तरी दैना कादंबरीची निर्मिती करणारा कादंबरीकार मुळातच पारधी जमातीचा असल्यामुळे स्वजातीच्या स्वजाणिवांसह कादंबरीची निर्मिती करतो.

लक्ष्मण गायकवाड हे पारधी जमातीचे जीवन अनुभव 'वकिल्या पारधी' या कादंबरीतून मांडत असले तरी ते स्वत: वडार जमातीचे असल्यामुळे त्यांच्या कादंबरीतील जीवनजाणिवा या सहजाणिवेतून व्यक्त झालेल्या आहेत. मात्र जीवनानुभवाचा परिपूर्ण अविष्कार घडविण्यात भास्कर भोसलेंपेक्षा लक्ष्मण गायकवाड अधिक यशस्वी झालेले दिसतात. याचे मुख्य कारण लक्ष्मण गायकवाड हे विमुक्त जातीच्या न्याय हक्कासाठी चळवळ करणारे कार्यकर्ते आहेत. एवढेच नाही तर विमुक्त जातीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा त्यांनी परिपूर्ण अभ्यास केलेला आहे. त्यामुळे त्यांनी पारधी जमातीच्या सहजाणिवांतून वाङ्मयनिर्मिती केलेली असली तरी जीवनानुभव अधिक जिवंत झालेले दिसतात. भास्कर भोसले स्वजाणिवेतून कादंबरी निर्मिती करत असले तरी त्यांच्या जीवनानुभवात अभ्यासाची जोड नसल्यामुळे 'दैना' कादंबरीतील जीवनानुभव ढोबळरित्या व्यक्त झालेले आहेत. या दोन्हीही कलाकृतीत जीवनजाणिवा व्यक्त करण्याच्या संदर्भात हा अंतर्विरोध असला तरी सच्ची मांडणी भास्कर भोसले यांनी केलेली दिसते.

'दैना' मधील सामाजिक अनुभवांना सामाजिक व्यवस्थेतील अत्याचारी प्रवृत्ती कारणीभूत आहे हे मान्य करूनही भास्कर भोसले यांनी पारध्यांच्या दारिद्र्याला सदर समाज आणि त्यांच्यातील रुढ झालेले संस्कार कसे कारणीभूत आहेत, याचे निर्देशनही या कादंबरीत केले आहे.

**दैना कादंबरीचे सामाजिक मूल्यमापन :-**

१. पारधी समाजामध्ये कुटुंबनियोजनासारख्या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचा परिणाम त्यांच्या दारिद्र्यात वाढ होण्यात कसा होतो. याचा उल्लेख या कादंबरीमध्ये आलेला दिसून येतो. उदा- पारधी समाजामध्ये मुलींची संख्या जेवढी जास्त तेवढे तिला लग्नामध्ये द्याज मिळत असे. त्यामुळे इतर मुली असल्या तरी वडिलांना आणखी मुली व्हाव्या असे वाटे. तसेच लेखकाच्या आईने कधीही इंजेक्शन घेतलेले नसते. त्यामुळे तिला ऑपरेशन करून घेण्यास भिती वाटत असे. म्हणून ऑपरेशनच्या गाडीच्या भितीने आई-वडिल लांब काटवनात पळून जात असत तर कधी पाटस या गावी पळून जात असत. अशावेळी मुलांची घरामध्ये खाण्या-पिण्याची आबाळ होत असे. अनेक भयानक घटनांना त्यांना सामोरी जावे लागे. ( पृ.२२-२३)

२. पारधी लोकांना राखणीच्या बदल्यामध्ये बलुते न मिळाल्याने ते चोरीसारख्या गैर मार्गाचा अवलंब करताना दिसतात. उदा- लेखकाच्या वडिलांना आलेल्या अनुभवानुसार ते म्हणतात की, 'बाभूळसरच्या पलिकडचे पारधी, कुणब्याने बलूतं दिलं नाही तर रातची लटमार करत्यात. ते चोरी करून पोट भरत्यात.' (पृ.२७-२८)

३. लेखकाच्या वडिलांना एके दिवशी पोलीस पकडतात आणि तेथून पुढे वडील पोलिसांचे ग्राहक बनतात. उदा- कानगावामध्ये चार-पाच ठिकाणी चोऱ्या होतात आणि त्यातील एक चोर आपला जोडीदार म्हणून लेखकाच्या वडलांचे नाव घेतो. त्यामुळे पोलीस लेखकाच्या वडिलांना नाहक पकडतात. तेथून पुढे जेव्हा जेव्हा पोलिसांना पैशाची गरज असेल तेव्हा तेव्हा ते लेखकाच्या वडिलांना पकडून नेत असत. (पृ.४०)

४. चारचौघासारखी नोकरी मिळवण्यासाठी लेखक जातीचा दाखला मिळवण्याचा प्रयत्न करतो. पण हाती अपयशच येते. उदा- लेखक आपल्या आजोबांच्या नावची



SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

जमीन हाती घेण्यासाठी मामलेदार कचेरी ते जिल्हाधीकारी कार्यालय अशा अनेक फेऱ्या मारतो. तेव्हा कोठे जमिनीचा सातबारा उतारा मिळतो. वर्षानंतर सगळी कागदपत्रे तयार करतो. परंतु जातीचा दाखला त्याला मिळत नाही. जातीतून असा अनुभव लेखकाला मिळत असल्याचे दिसून येते. (पृ.९५)

५. गुन्हेगारीमध्ये पारधी लोकच पुढे नाहीत तर, सवर्ण लोकही आहेत असे लेखक सांगतो. उदा- पारधी लोकांनी चोरी न करता कष्ट करून उदरनिर्वाह केला तरी त्यांनी चोरी केली असेच पोलीस म्हणतात. पण लेखक सांगतो की, 'तरूण शिकलेले परंतु कमी कष्टात मोठे होण्याचे स्वप्न रंगवणारे सभ्य समाजातील तरुणही गॅसकटरच्या साह्याने मोठमोठ्या बँका फोडत आहेत. तिथं आम्ही काय करावं '(पृ.१७८)

६. भटक्या - विमुक्त जमातीमध्ये शिक्षणाला नगण्य स्थान दिले जाते. उदा- लेखक सांगतो की, पारधी लोकांप्रमाणेच कंजारभाट, डोंबारी, वैदू, पिंगळा तसेच भटके, नंदीवाले या सर्वत्र भटकंती करणाऱ्या जमाती अत्यंत कष्ट करून उदरनिर्वाह करणाऱ्या जमाती आहेत. या जातींमध्ये शिक्षण गैरे गोष्टींना नगण्य स्थान दिले जाते. म्हणूनच लेखक म्हणतो, 'सुधारणा, शिक्षण, म्हणज येड्याच्या इस्पितळात सोडणे, असा त्यांचा समज. बाकीचे लोक इकडं चंद्रावर स्वाऱ्या करताहेत. आणि हे रात्रीच्या वेळी एका गोधडीतच चंद्र-सूर्य बघताहेत.'(पृ.१६१)

७. पारधी तरूण 'ड्राप' नावाचा लुटमारीचा नवीनच व्यवसाय करत असल्याचा उल्लेख कादंबरीत केलेला आहे. उदा- दैना कादंबरीतील उल्लेखानुसार इंदापूर, श्रीगोंदा, दौंड या तालुक्यांमध्ये हा 'ड्राप' नावाचा व्यवसाय चालतो. त्यानुसार या व्यवसायातील तरूण चार मणी सोन्याचे दाखवून बाकीचे पितळेचे विकतात. तसेच एखाद्या सराफाला फसवून जंगलात किंवा दाट शेतामध्ये घेऊन जातात. त्याच्याकडचे पैसे काढून त्याला बेदम मारहाण करून पळून जातात. (पृ.१७५)

८. पारधी लोकांना मिळालेली जमिन बळकावली जाते. याचा प्रत्यय लेखक स्वत:च्या उदाहरणावरून देतो. उदा- लेखक सांगतो की त्याच्या आजोबांची पंधरा एकर जमीन होती. तेव्हा त्यावेळी असणारे फॉरेस्ट अधिकारी भोंडे पाटील हे जमीन बदली करून देतो म्हणून फसवतात. ती जमीन फॉरेस्ट म्हणून घोषित करतात. त्यानंतर लेखकाला अमाप पैसे खर्च करूनही ती जमीन परत मिळत नाही. यावरून गरिबांच्या अडाणीपणाचा फायदा सवर्ण लोक कसा करून घेतात त्याचा प्रत्यय येतो. (पृ.१७९)

९. पारधी जमातीवर सवर्ण लोकांनी अनेक अत्याचार केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे-

१.पारधी लोक विनापरवाना धरणामध्ये मासे धरतात म्हणून ठेकेदार, गावकरी हे संगनमताने पारध्यांची घरे पेटवतात. (पृ.१६८)

२. २६ जानेवारी २००६ रोजी इंदापूर येथील पारधी नागवे होऊन झेंडावंदन करणार होते. म्हणून तेथील फौजदार पारधी लोक दिसताक्षणीच गोळीबाराचा आदेश करतात.

३. पारधी तांड्याने पोटासाठी कणसे चोरली म्हणून त्या तांड्यावर सवर्ण लोक सामुहिक बलात्कार करून त्यांची पाले जाळतात. (पृ.१७२)

४. केवळ संशयावरून तसेच जमातीतल काही गुन्हेगारी व्यक्तिमुळे पोलिसांकडून, सवर्णांकडून आणि गावकऱ्यांकडून पारधी लोकांवर वारंवार अत्याचार केले जातात. संपुर्ण जमातीचा नाश संगनमताने करणे, झोपेमध्येच त्यांना गोळ्या घालून मारणे असे प्रकार केले जातात. (पृ.१७४)

१०. पारधी लोक आरोग्याबाबत अस्वच्छता बाळगत असल्याचे अनेक दाखले येथे आलेले आहेत.यासंदर्भात लेखक स्वत:च्या वडिलांच्या उदाहरणावरून सांगतो की, देवीच्या यात्रेच्या वेळीस वडील प्रथमच आंघोळ करताना लेखकाला आढळतात.

म्हणून तो म्हणतो की, 'दिवस उगवता कधी न नहाणारा बा आंघोळ करून तयार झाला. लेखकाची आई आजारी असायची तेव्हा सर्व भावंडे मळलेल्या कपड्यानेच शाळेत जातात. तेव्हा शाळेतील गुरूजीही 'पारधी जरा वढ्यात जाऊन डुंबून' असे म्हणून त्यांच्या अस्वच्छपणाची चेष्टा वर्गात करतात. तसेच स्वत: लेखकही एके ठिकाणी म्हणतो की, 'आठवड्यातून मिळाली तर आंघोळ नाहीतर तीन-तीन दिवस बीन आंघोळीचे शाळेत जायचो.'तसेच पारधी म्हणजे अस्वच्छ असे समीकरणच त्यांनी सांगितलेले आहे. (पृ.३४,३९,४८)

११. देवाला घुड्या लावणे हा प्रकार पारधी समाजामध्ये असल्याचे दिसून येते. उदा- कादंबरीत आलेल्या उल्लेखानुसार लेखक आपल्या वडिलांचे वैशिष्ट्य सांगताना म्हणतो की, पैसे हाती आले की वडील देवाला घुड्या लावायचे म्हणजे देवाला साकडे घालायचे आणि देवदेव करायचे देवाला घुड्या लावताना देवाच्या तर्फे ते स्वत: बोलायचे. तेव्हा घुड्या घरातील शांतीसाठी बोकड पाहिजे असे उत्तर देत असे. उदा- 'देव यंदा बोकड मागतोय असे घुड्या उत्तर द्यायचा.'(पृ.५४)

१२. पारधी समाजामध्ये गुप्तधनासारखे गैरसमज आजही असल्याचे दिसून येते. उदा-लेखकाचे वडील कोणाच्या तरी सांगण्यावर विश्वास ठेवततात की, आपल्या जमिनीमध्ये गुप्तधन आहे. यावर लेखकही विश्वास ठेऊन ते गुप्तधन मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न करताना दिसतो. ऐपत नसतानाही तो त्यासाठी देव-देवऋषीपण करतो.व त्यांनी सांगितल्याप्रमाणे चार हजार रूपये खर्च करून होम-पुजा करतात. पण इतके करूनही त्यांनात्यामध्ये अपयश येते. दारिद्रय आणि त्यातून रूढ झालेली पद्धत म्हणून त्याचा निर्देश करता येईल. (पृ.९६)

१३. पारधी समाजामध्ये कौटूंबिक समस्या ही देवऋषीपुढे मांडली जाते. आणि देवऋषी लोक त्याचा फायदा घेऊन संधी कशी साधतात याचे प्रत्यंतर यामध्ये येते. उदा-लेखकाची पत्नी शोभा हिला आपल्या पतीने आई-वडिलांजवळ न राहता

आपल्याजवळ आपल्या माहेरी जावे असे वाटायचे व आपल्या इच्छेप्रमाणे सर्व काही व्हावे यासाठी ती देवऋषीपण करत असे. जेव्हा ही गोष्ट लेखकाच्या घरातील लोकांना समजते तेव्हा तेही त्याच देवऋषीकडे जातात आणि आपल्या समस्या मांडतात. तेव्हा देवऋषी त्यांना धीर देऊन त्यांच्याकडील सर्व बातमी काढून घेऊन लेखकाच्या सासूला सांगून दोन्हीकडचे पैसे घेऊन त्यांची फसवणूक करत असत. व त्याला हे अज्ञानी लोक बळी पडत असे. धर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या फसवणूकीचे हे उदहरण होय. (पृ.१५७)

१४. पारधी तरुणी दारिद्र्यामुळे वासनेची शिकार कशी बनते हे कादंबरीकार गोदाच्या अनुभवावरून सांगतो. उदा-लेखकाच्या कुटुंबात दहा बहिण-भावंडांचा पसारा होता. अशावेळी लोकांच्या घरी मागून लहान भावंडांचे, आई-वडिलांचे पोट भरावे लागत असे.त्यामुळे घरातील मोठी असणारी बहिण गोदा ही शाळा चुकवून भाकरी मागण्यासाठी जात असे.ती दिसायला सुंदर असल्यामुळे भाकरी मागायला जाताना अनेकांच्या कामूक नजरा तिला डसत असत. अशाच एका वासनेचा ती बळी पडते. त्यातून तिला दिवस जातात. म्हणून लेखक म्हणतो, 'गरीब गोदा फसली होती त्याच्या देखनेपणाला. आणि त्यातून ती गरोदर राहिली. पोट मोठं दिसलं की ते कळणारच'(पृ.४६-४७)

१५. पारधी स्त्रियांवर झालेल्या लाठीमाराची दखल घेतली नसल्याचा उल्लेख या कादंबरीत आलेला आहे. उदा- एके दिवशी लेखकाची आई दौंडच्या बाजारामध्ये कपडे खरेदी करण्यासाठी गेली असता, तेथे पारध्यांवर लाठीमार होतो आणि लेखकाची आईही त्यामध्ये सापडते.त्याचे कादंबरीत आलेले वर्णन असे, 'मोर्चावर लाठीमार झाला तर पेपरला आलेलं पाहिलं मी. पण पारध्यांच्या गड्यांवर नाही , तर बायांवर लाठीमार झाला तरी त्याची जराही दखल घ्यायला कुणी कुत्रा येत नाही, हे ही पाहिलंय !'( पृ.७७)

१६. पारधी स्त्रियांचा वापर पैशासाठी कसा केला जातो. हे लेखक स्वत:च्या उदाहरणावरून सांगतो. उदा- पारधी समाजात मुलीला विवाहामध्ये द्याजाच्या रूपात ठरलेली रक्कम मुलाकडून दिली जाते. ती जर दिली गेली नाही तर त्या मुलीचा दुसरा विवाह द्याज घेऊन केला जातो. स्वत: लेखकाचा विवाह होताना लेखक आपल्या भावी सासऱ्यांनाा म्हणतो की, 'जर मी मुलीचे पैसे दिलेच नाही तर -' यावर मुलीचे वडील मुलीला घेऊन जाण्याची भाषा करतात. अशाप्रकारे पारधी समाज हा फक्त पैशाशी नाते प्रस्थापित करू पाहताना दिसतो. (पृ.१४०)

१७. कादंबरीकारच्या कुटुंबाला भेडसावणारी समस्या ही बहुतेक सर्व पारधी लोकांची असावी कारण गावात चोरी झाली की पोलीस पारध्यांच्या पालावर येत असत. म्हणून पोलिसांच्या भितीने घरामध्ये कोणीच पुरुषमंडळी राहत नसत. लेखकाच्या भावंडांना व त्याच्या आई- वडिलांना पोलिसांच्या भितीने आपले पाल सोडून दूर ठिकाणी माळरानात राहावे लागत असे, अशावेळी लेखकाची मोठी बहिण गोदा व अंध बहिण यांना सोडून जाताना त्यांना अपराध्यासारखे वाटायचे. कारण पोलीस रात्री - अपरात्री कधीही पालावर येत असत. त्यामुळे आपण आपल्या बहिणीचे संरक्षण करू शकत नाही म्हणून अपराधी भावनेने व जड अंत:करणाने सर्व निघून जात असत. (पृ.८१-८७)

१८. पारधी समाजामध्ये सुंदर स्त्री जन्माला येणे हे त्यांच्या दृष्टीने एक संकटच ठरते. याचा प्रत्यय लेखकाची बहिण आणि भावजय यांच्या उदाहरणावरून येतो. लेखकाची बहिण ही सुंदर आणि तरुण असल्यामुळे ती जेव्हा आपल्या भावंडासोबत बाहेर जात असे तेव्हा काही टवाळखोर मुले तिचा विनयभंग करत असत. त्याचप्रमाणे लेखकाची भावजय देखिल खूप सुंदर असल्यामुळे लेखकाच्या कुटुंबाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असे. तिला पाहताच रात्री त्यांच्या घरी दगड पडू लागतात. तिचे रुप एखाद्या राजकन्येप्रमाणे असून ती एका पारध्याच्या घरी

जन्मली हाच तिचा दोष होता. असे लेखक म्हणतो. विमुक्त जातीचे जीवन असुरक्षित असते याचा प्रत्यय या उदाहरणावरून येतो. (पृ.३३-९६).

**१. स्त्रीजीवन :-**

पारधी समाजामध्ये स्त्रीला मारहाण केल्यामुळे किंवा तिच्यावर जुलूम केल्यामुळे पारधी समाज हा त्या व्यक्तिला बहिष्कृत करतो किंवा त्याच्याशी रोटी-बेटी चा व्यवहार ठेवत नाही. तसेच पारधी समाज हा अनेक धार्मिक रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांनी जखडलेला दिसून येतो. स्त्रीने घराच्या वरच्या बाजूस लघुशंकेस बसणे तसेच घराच्या वरच्या भागामध्ये स्त्रियांचे कपडे वाळत टाकण्यास मनाई असते. एखाद्या परपुरुषाने स्त्रीला भोगले किंवा तसा प्रयत्न केल्यास त्या स्त्रीचा पती तिला घरात घेत नसल्यामुळे तिला कुटुंबाचा त्याग करावा लागतो.

पारधी समाजाकडे परंपरेनुसार गुन्हेगार म्हणूनच पाहिले गेल्यामुळे पोलीस नाहक चोरीच्या आरोपावरून त्यांना शिक्षा देऊ लागले. आणि त्यातून सुटका करून घेण्यासाठी पारधी लोक आपल्या घरातील स्त्रिया म्हणजे आई, बहिण, मुलगी यांना विकू लागले. कारण चोरीशिवाय अन्य कोणतेही साधन त्यांच्याजवळ नसल्याने पैशासाठी मुली या घरातून त्या घरात विकल्या जाऊ लागल्या. त्या पैशामुळेच स्त्रीला द्याजाचे महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे जात-पंचायत राहिली नाही. तसेच जातीमध्ये असलेल्या नियमांचा कोणी भंग केला तर दंड म्हणून पैसे किंवा पैशासाठी मुलीला विकले जायचे. या कारणामुळेही स्त्रीला द्याजाचे महत्त्व प्राप्त झाले. पारधी समाजात लग्नामध्ये भांडणासारखे प्रकार हमखास होतात. पूर्वी विवाह पद्धत फार कठोर होती. उकळत्या तेलातून नवरा - बायकोने पैसे काढले तरच तो विवाह पवित्र समजला जात असे.

**२.जात-पंचायत :-**

पारधी समाजात पूर्वी जात-पंचायत स्वतंत्र होती आणि त्याचा प्रमुख हा पाटील असायचा. बुद्धीच्या क्षमतेनुसार पाटील हे पद जातपंचायत निवडत असे. प्रत्येक कुटुंब किंवा कुळाच्या तक्रारी सरपंचाकडून ऐकूण पाटील न्यायनिवाडा करत असे. पारधी समाजात जातीचे नियम खूप कडक असत.

**३. वनौषधी :-**

वनौषधींचा शोध हा भिल्ल - पारधी, कातकरी, ठाकर - पारधी या भटक्या-विमुक्त जमातीच लावत असत. उदा- मोहाच्या झाडापासून दारू तयार करणे, वाईवात या रोगासाठी पारव्याचे रक्त अंगाला चोळणे, दमा या रोगासाठी लिंबाचा रस पिणे, बाळंतपणामध्ये गरम दगड किंवा सळई यांचा शेक घेणे, तसेच पारधी लोक चित्तरे, पारवे यांच्या शिकारीसाठी घोड्याच्या केसांचे फासे तर, मोर, वाघ, हरिण यांच्या शिकारीसाठी हरणांच्या नसांपासून किंवा सांध्यापासून बनवलेले फासे वापरत असत. अशाप्रकारे शिकार करून आणि जंगलातील फळे, कंदमुळे खाऊन उदरनिर्वाह करणारे पारधी लोक जंगलाशी नाते तुटल्यामुळे पुढे सोन्या-चांदीच्या चोऱ्या करू लागले.

**३.जत्रा :-**

देवदेव करणे आणि सर्व जात-पंचायतीला आमंत्रण देणे या गोष्टीला पारधी समाजात पवित्र मानले जाते. परंतु या देवकार्यात स्त्रियांचा सहभाग नसतो. किंवा स्त्रियांना देवकास स्पर्श करणे हा गुन्हा मानला जातो. लहान, पवित्र मुलींनाच या कार्यात सहभागी करून घेतले जाते. परंतु देवदेव करताना पारध्यांचा एक प्रघात आहे की,ज्या पारध्यांच्या कुळीने ज्या दिशेने आगमन केले असेल त्या दिशेला तोंड करून देवदेव करावा. देवदेव करताना देवाला बोकड अर्पण करणे ही श्रद्धा आहे. त्याचवेळी देवाला घुड्या लावून देवामार्फत आपले विचार मांडले जातात.

बोकडाच्या मानेवरून पाणी फिरवले असता त्याने अंग थिरकावले तरच तो बोकड कापला जाई. म्हणजे उजव्या घुड्या बसल्या तरच तो बोकड कापला जाई. आणि डाव्या घुड्या बसल्या म्हणजे बोकडाने अंग थिरकावले नाही तर त्याला शंढ करून जीवदान दिले जाई. पहिल्या शीरेचे रक्त देवाला आणि दुसऱ्या शीरेचे रक्त जत्रा करणाऱ्याने प्यायचे असा प्रघात आहे. काळे, चव्हाण या कुळीही अशाप्रकारे आपल्या दिशा ठरवून दिलेल्या दिशेप्रमाणे देवदेव करतात. परंतु शिंदे, पवार, या दोन कुळी देवाला हाल्याचा भोग देतात. आणि नंतर प्रत्येक पाहूण्याला प्रसाद म्हणून मांसाचे तुकडे दिले जातात. प्रत्येक कुटुंबातील थोरल्या घराकडे मूळ देवी दिली जाते. दुसऱ्या अपत्यांनी देवीला सजवून आणायचे ही प्रथा त्यांनी पाळावयाची असते. पारधी जमात ही शिवाची आणि तुळजाभवानी यांची भक्ती करते.

**'दैना' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन :-**

'दैना' ही भास्कर भोसले यांची आतमकथनपर कादंबरी आहे. ही कादंबरी घटनाप्रसंग, वातावरण, निसर्ग, श्रद्धा-समजुती, रुढी- परंपरा, संस्कृती, नातेसंबंध, व्यक्तिरेखा, समाजजीवन, वादविवाद यांनी परिपूर्ण अशी आहे. 'दैना' ही कादंबरी आजवर उपेक्षित राहिलेल्या आणि गुन्हेगार म्हणून घोषित केलेल्या पारधी समाजजीवनाचे वास्तववादी प्रकटीकरण करते. स्वत: पारधी जमातीतील व्यक्तिचे जीवन जगत असताना त्यांच्या जीवनाला प्राप्त झालेले नायकत्व हे अनेक पारधी व्यक्तिंच्या दु:खाचे प्रतिनिधित्व करते. त्यामुळे पारधी जमातीच्या व्यथा, वेदना, विद्रोह, दु:ख, अत्याचार, अन्याय यांना स्वानुभवातून मांडल्यामुळे लेखक यशस्वी झाले आहेत. त्याचा प्रत्यय त्यांच्या निवेदनातून, वातावरणनिर्मितीतून आणि भाषा व शैलीतून घडत जातो. त्याचे सोदाहरण विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

कोणत्याही कादंबरीच्या वाङ्मयीन मुल्यमापनामध्ये निवेदन, वातावरणनिर्मिती आणि लेखकाची भाषा व शैली यांना महत्त्वाचे स्थान असते. 'दैना' या कादंबरीचे

निवेदन प्रथमपुरुषी असून निवेदनाच्याद्वारे कादंबरीतील घटनाप्रसंग, आशयविष्कार आणि व्यक्तिरेखा यांचे घडलेले प्रत्यक्ष दर्शन महत्त्वाचे आहे.

कादंबरीतील निसर्गवर्णनांची संख्या बरीच आहे. मुळातच लेखक भास्कर भोसले हे कवी आहेत. त्यामुळे निसर्गवर्णने रेखाटण्यामध्ये त्यांची हातोटी असल्याचे दिसून येते. त्यासंदर्भातील निसर्गवर्णनांची काही महत्त्वाची वर्णने पुढीलप्रमाणे, उदा–'काळूबाई शिखरावर सूर्यकिरण सर्कशीतल्या बॅटरीगत जाऊन फिरु लागलं. सप्तरंगांची उधळण झाली. देवीचा सत्कार त्या इंद्रधनुने केलाय असं विलोभनीय चित्र भासत होतं. काळूबाईचं मंदिर हे धुक्याच्या सहवासात झुलत होतं.'(पृ.११७) तसेच, 'धुक्याचे थवेच्या थवे, अंगाला स्पर्शून जात होते. गार हवा, उंच चंदेरी झाडं, समोर धोम धरण हात-पाय पसरून मजा घेत होतं. खाली शेवाळलेली कौलही निसर्गाला साज चढवत होती. सारा आसमंत हिरवा होता. डावीकडं एक उंच धबधबा कोलांट्या उड्या घेत कोसळत होता. वाऱ्यावर माना डोलावणारी गवत पाती पायाशी लोळत मजा घेत होती.'(पृ.११८) अशा प्रकारच्या वर्णनातून लेखकाची कल्पनाशक्ती दिसून येते.

दैना कादंबरीमध्ये घटनाप्रसंगांना खूप महत्त्व आहे. त्यामुळे कादंबरीला अधिक जिवंतपणा आलेला आहे. चित्तथरारक असे अनेक प्रसंग आल्यामुळे प्रसंगाविषयीची उत्कंठा वाढली आहे. लेखक व त्याच्या भावाला हिंस्र पशूंशी सामना करावा लागतो तो प्रसंग. उदा– 'आम्ही नळीत शिरलो अन् तोंडालाच भला मोठा अजगर फुत्कारा सोडत पाठीमागे लागला. घाबरगुंडी उडाली. तुप्या पुढं मीच मागं. माझी तर बोबडीच वळाली. तुप्या काही मागं वळूनसुद्धा बघना. अजून मोरीच्या मध्यभागीच होतो. मोरीत एक वटवाघूळ घिरट्या घालत होतं. ते तुप्याच्या छातीला धडकलं. तुप्याला ते चावायला लागलं.'(पृ.१०८) नैसर्गिक आपत्तीच्या वर्णनाप्रमाणेच मानवी आपत्तीचे वर्णनही असेच बोलके झाले आहे. तसेच उदा–

'नुसती गारपीठ उडालेला आवाज येत होता. धडाधड पत्रे उडून रेल्वेच्या बाजूला पडत होते. शिर्रर, गरगर येऊन गारा पालावर आदळत होत्या. तशा पालाच्या चिंध्या झाल्या, इतइत ठिगळं झाली. गारांच्या झपाट्यात बापु पाणी काढून देत व्हता. त्याला गारा सडकत होत्या. पण तरुण रक्त असल्याने बाप्याने उभा पाऊस अंगावर घेतला.'(पृ.६०) अशाप्रकारच्या घटनांना वास्तवाचा स्पर्श असल्याने ते अधिकच जिवंत वाटतात.

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखा रेखाटण्याचे आणि त्यांना जिवंतपणा देण्याचे काम लेखकास करावे लागते. दैना या कादंबरीतील व्यक्तिरेखा आपन जरी पाहिल्या नसल्या तरी वाचकांच्या नजरेसमोर त्या उभ्या करण्याचे सामर्थ्य कादंबरीकाराच्या निवेदनशैलीत आहे. उदा- गावातील एका स्त्रीविषयी लेखक महणतो, 'काळी बाय दिसाय डेंजर, हिरवं लुगडं, भ्याच वाटलं तिचं' त्याचप्रमाणे शाळेतील सुंदर शिक्षिकेचे वर्णन करताना म्हणतो, 'गालावर खळी, हनुवटीला खड्डा, गोरा रंग, नुकतंच लग्न झालं होतं' पोलिसांचे वर्णन करताना लेखक म्हणतो, 'सगळे पान खाऊन, लाल ओठ, भरदार मिशा, डोळ्यावर गॉगल अशा ऐटीत' तसेच आईबद्दल ' हाडांचा सापळा झालेली,' वडिलांबद्दल लिहीताना 'बा ची तब्येत कोल्हापुरी पैलवानागत,' 'नागिणीगत सळसळणारी' शेजारची सुनंदा, लेखकाच्या भाऊ बापूविषयी 'येडा, लहरी स्वभावाचा. चोर चोर करून मारलेलं, पोलिसांनी धरलेलं', बहिण गोदाविषयी 'दिसायला देखणी आणि स्मार्ट' यांसारख्या अनेक व्यक्तिरेखा लेखक अगदी सहजपणे रेखाटतो.

कादंबरीमध्ये व्यक्तिरेखांचे संवाद हे त्या व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचाच एक भाग असतो. त्यानुसार आपणास त्या व्यक्तिचा स्वभाव, त्याची विचारसरणी, त्याचा परिसर इ. गोष्टी लक्षात येतात. दैना या कादंबरीतील काही संवाद पुढीलप्रमाणे.

महाशब्दे हवालदार यांचा संवाद, 'काय रे तुला बायको, पोरगी नाही का? मग लोकांच्या बायांचा का हात धरला रे भडव्या ? चल तुला गेटात दाखवतो.'(पृ.३८) पोलीस किंवा सवर्ण व्यक्ती पारध्यांशी कधी आपुलकीने वागत नाही. तसेच सवर्ण स्त्रियाही त्यांना हीन म्हणूनच वागवताना दिसतात. याचे उदा- म्हणून पुढील संवाद देता येईल. उदा- 'हो, उंबऱ्याच्या बाहेर हो, दारात उभं राहून मागायचं. पारधाड घरात घुसतंय! जा सन-फीन काही नाही.' (पृ.६३) या संवादातून घृणा-तिरस्कार व्यक्त होतो. त्यातही माणुसकी जपणारे काही लोक असतात हे पुढील संवादातून दिसून येते. उदा-मच्छिंद्र या गावकऱ्याचा संवाद, 'लाल्या सगळी पारधी पळून जाऊ देत, तू मात्र आमच्या इथं रहा. लेका एका येड्यापायी सारीच येडी होऊ नका. रहा आमच्या एखादा तरी.'(पृ.१०३) अशाप्रकारे व्यक्तिच्या तोंडून निघणारे संवाद हे त्या त्या व्यक्तिमत्वाशी निगडीत आहेत.

कादंबरीमध्ये लेखकाने अनेक उपमा वापरलेल्या आहेत. उपमा या अगदी सहजपणे अवतीर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे लेखकाच्या शैलीचे वेगळेपण दिसून येते. कादंबरीमध्ये अवतरलेल्या उपमा पुढीलप्रमाणे उदा- 'रोज सशाच्या काळजाने दिवस उगवायचा, यंत्राच्या धडधडीगत काळीज धडधडत रहायचं....'(पृ.७६), 'अती सुंदर घर रतनचं, चार पिलं आणि त्याचं घरटं असं हवेत सुगरणीगत आनंदाने झोका घेत होतं.' (पृ.९४), 'एखाद्या सुंदरीचा पदर हवेत फडकत रहावा, तसं धुकं अंगाला अवतीभवती घुटमळत निघून जायचं'(पृ.११९), 'बा अन् बापू निम्म्या नदीत उतरले तेव्हा वसुदवेचा आठवन झाली.' तसेच ' बंद उशी उस्तारून कापसाच्या म्हाताऱ्या उडून कुठंही जाव्यात तशी आमच्या घरची स्थिती झाली.' त्याचबरोबर मांजरागत गुरगुरणे, बकऱ्यागत लटकलेले फणस, म्हशीगत मासा, धडाएवढी मरळ, राजकन्येगत रूप, नक्षत्रासारखी पोर, खवळलेल्या समुद्रागत. यांसारख्या अनेक उपमा या दैनंदिन जीवनातील वापरल्यामुळे तो प्रसंग किंवा

एखाद्या व्यक्तीचे विशेष आपणास समजते. वाचक लेखकाच्या मन:स्थितीशी समरस होऊन जातो.

'दैना' ही कादंबरी पारधी समाज जीवन चित्रित करणारी असल्यामुळे साहजिकच त्यामध्ये पारधी संवाद येणे अपरिहार्य आहे. लेखकाने या कादंबरीमध्ये अनेक पारधी संवाद वापरलेले आहेत. आणि शेवटी प्रत्येक संवादाबरोबर त्याचा अर्थ कंसामध्ये मराठीत दिलेला आहे. दैना या कादंबरीमध्ये आलेले पारधी भाषेतील संवाद पुढीलप्रमाणे, लेखकाच्या मामाच्या संवाद 'शू बोलू शेवरा मारू काम छुटी गय.'(काय सांगु शेवरा माझे काम सुटले बघ.) (पृ.२६), लेखकाच्या मामाच्या मुलीचा संवाद, 'आला, बा भोसल्याने न हिनी छोरी ब्यामुळे सारु गाम मंगिलीदू' (अहो बाबा, भोसल्याने आणि त्याच्या मुलांनी संपूर्ण गाव मागितले आहे) (पृ.३७) लेखकाचा भाऊ बापूचा संवाद, 'आला लाल्या, केतरा दन थी मळूकरच आ येडा भुलाई गयो कोणी ला जरा बेक आपण कब वातं खोले ' (अरे लाल्या किती दिवसांनी तू भेटतोस! या येड्याभावाची आठवण येत नाही तुला? लहानपणाची तरी आठवण लक्षात ठेव. अरे आपण एकत्र वाढलो, राहिलो, एका रक्ताचे जीवाला जीव देणारे असे.) (पृ.१६१) लेखकाच्या सासूचा संवाद 'आरी ये बावरी, नि लाडकी! नाख घर, हावनाभ केतरा पैसा छत्तोयदी काडू'- (अगं चल घरी नवऱ्याची लाडकी, तुझ्या नवऱ्याचे केवढे पैसे आहेत तेवढे देऊनच टाकते.) (पृ.१५७) यांसारखे अनेक छोटे-मोठे संवाद या कादंबरीत आलेले आहेत आणि त्याचा अर्थही लेखकाने तात्काळ स्पष्ट केलेला आहे. त्यामुळे वाचकांनाही त्या भाषेचा अर्थ समजण्यास मदत होते. त्याचप्रमाणे लेखक भास्कर भोसले हे कविवृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या मनातील भावना, उद्रेक यांना काव्यात्म छटा प्राप्त झालेली आहे. अशा काव्यात्म छटा कादंबरीमध्ये जागोजागी आढळतात. त्यामुळे कमी शब्दात लेखकाच्या भावना पोहोचण्यास मदत होते.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१. इतरांसारखे आपलेही लग्न व्हावे, आपणालाही सुंदर पत्नी मिळावी ही आकांक्षा मनामध्ये ठेऊन लेखक परमेश्वराजवळ मागणे मागतो. 'असेल हाताला आमच्या धरून चालणारी एक छानशी देखणी मुलगी. हौसेनं तिच्या डोक्यावर दोन वेण्या फुलवीत चिडवीन 'बकरी माझी' म्हणून!' (पृ.१४६)

२. आपले दारिद्र्य हटेल, परिस्थिती बदलेल आईला सुख मिळेल अशी अपेक्षा लेखक बाळगत असतो. पण भावंडांची लग्ने होऊनही आईचे कष्ट मात्र वाढतच जाते. तेव्हा लेखकाच्या मनामध्ये उठलेले तरंग- 'ऋतुमागून ऋतु येतील, जिंदगीचं हे रडगाणं रहाटगाडग्यात फिरत राहिल. माझ्यासारखे कित्येक आले अन् कित्येक गेले. रुक्ष जीवनास आकार देणारा पाहिजे होता. स्मशानात जळतीवर जळावं तसा जळत राहीन मी, आईनंतरही....'(पृ.१८६)

३. पोलिसांच्या भितीने लेखकाच्या कुटुंबाच्या दाहीदिशा झालेल्या होत्या. अशावेळी लेखक लिहितो की, 'वटवृक्षागत वाढत चाललेलं आमचं घर वाळवंटातल्या वृक्षागत उन्मळून पडत होतं. एखाद्या मुळीला नवा कोंब फुटेल व तो जोमाने वाढेल हीच स्वप्न उराशी बाळगून होतो.' (पृ.११७)

अशाप्रकारच्या काव्यात्म छटांमुळे लेखकाची त्यावेळची मन:स्थिती लक्षात येण्यास मदत होते

पारधी जमातीमध्ये दैनंदीन जीवनात अनेक भांडण-तंटे हे होतच असतात त्यामुळे अर्वाच्य शिव्या, वाद, शिवीगाळ, हे सर्व ओघानेच येते. कादंबरीमध्ये त्या संयमाने मांडलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१. लेखकाचा मामा चतुर काळे याच्या घरी येण्यामुळे लेखकाच्या आई-वडिलांमध्ये भांडणे होत असत. त्यामुळे लेखकाचे वडील संतापून एके दिवशी शिव्या देतात --च्या, माझं खाऊन माझ्यावर उलटी टंगडी करू गेला भाडखाऊ तुझा भाऊ धोंड्याचा कार्टा, सदाचा बेण्या, --च्या' (पृ.२७)

२. गावातील बबनराव या व्यक्तीच्या घरी चोरी होते. तेव्हा तो लेखकाच्या वडिलांच्या घरी संशयाने येतो. आणि शिवीगाळ करतो. उदा –'ऐ नेन्या, तुझ्या आईची..., तुझ्या आईचा....' (पृ.५८)

३. पोपट शिंदे ही दारूडी व्यक्ती लेखकाच्या भावाला बापूला मारू लागते. तेव्हा त्याच्या तोंडून व्यक्त झालेली शिवीगाळ 'ह्याच्या आयची....xx..., ह्या बापूची... घातली, आप मतलबी निघाला अन् काय!'(पृ११४)

यांसारखे अनेक संवाद राग व्यक्त करणारे आहेत. त्यामधील अर्वाच्य शिव्या त्या-त्या रागाची पातळी उच्च करतात. परंतु लेखकाने त्या शिव्यांच्या जागी ....व...xx अशी चिन्हे वापरलेली आहेत. यावरून लेखकाचा संयम व संकोचवृत्ती दिसून येते. भास्कर भोसले यांनी या कादंबरीमध्ये आपल्या मनातील काही विचार कंसात मांडलेले आहेत. त्याचप्रमाणे एखाद्या अपरिचित ग्रामीण शब्दाचा ते अर्थ उलगडून दाखवितात एखाद्या प्रसंगाविषयी वाचकांना अधिक माहिती देण्यासाठी त्यांनी कंसामध्ये काही वाक्ये लिहिली आहेत. कादंबरीमध्ये अशी कंसातील वाक्ये सर्वत्र आढळतात. ती पुढीलप्रमाणे, एखादी गोष्ट वाचकांना समजली नसेल किंवा समजणार नाही असे गृहित धरून कंसामध्ये स्पष्टीकरण केलेले आहे. उदा – लेखक आपल्या लहानपणातील एक आठवण सांगतो, तो एकदा शाळेत जाण्यासाठी टंगळ-मंगळ करत असल्याचे पाहून आई त्याच्या डोक्यामध्ये उलाथणे मारते. त्याच्या खाणाखुणा सांगताना लेखक म्हणतो, (त्या खुणा अजून माझ्या डोक्यात कपाळावर आठवण म्हणून आहेत) (पृ.२६) तसेच भोसले व त्यांचे कुटुंब पोलिसांच्या भितीने अन्य ठिकाणी रहायला जातात तेव्हा आई नशिबाला दोष देत खूप रडू लागते. लेखक म्हणतो की कुणाचा बाप मेला तरी आई एवढे रडणार नाही आणि पुढे कंसामध्ये म्हणतो (पुढं खरंच नऊ-दहा वर्षांनी तिचा बाप वारला तरी ती रडली नाही हे एक विशेष) (पृ.८१) त्याचप्रमाणे लेखकाच्या घराण्यात

नसलेली चोरीची परंपरा लेखकाचा भाऊ बोकड चोरून मोडतो. ही गोष्ट केवळ एका व्यक्तिलाच माहित असते आणि लेखक व त्याच्या भावाच्या दटावण्याने ती व्यक्तिही कोठे बोलत नाही. पुढे लेखक कंसामध्ये म्हणतो (शेवटी त्याने सांगितलं, पण जवळ जवळ दिडएक वर्षांनी. मग मात्र आमच्यावर कुणी विश्वास ठेवीना, जो बापावर होता त्यो आम्ही गमवून बसलो.) (पृ.९१)
अशाप्रकारे कंसातील वाक्ये तो प्रसंग अधिक स्पष्ट करतात. किंवा त्यामागील कारणमीमांसा करतात.

उपरोक्त कादंबरीमध्ये लेखक भोसले हे काही वाकप्रचारांचा वापर करतात उदा- डोळ्यात तारे तुटणे, तीवर येणे,डोळ्यासमोर तारे चमकणे, पाट पडणे, पडणे, खार खाणे, चाळवण्या लावणे, काळीज लटकण उडणे इ.

भास्कर भोसले यांनी कादंबरीमध्ये अनेक विशेषणांचा वापरही केलेला आहे उदा-तुप्या - बिलंदर, बा - मोकार कोळी, बाप्या - गैराट, अन्या - चमत्कारी बाळ, सासु- व्हेरी डेंजरस बया, महाशब्दे हवालदार - यम, जाधव - करामती बाळ, आई - भेकड, आणि लेखक स्वतःला अग्निशामक हे विशेषण वापरतो. अधून - मधून अनेक इंग्रजी शब्दही लेखक कादंबरीमध्ये वापरतो. उदा - ॲक्शन, बेस्ट, डॅशिंग, डायरेक्ट, फायरिंग, ओरिजनल, हॅन्डसम, स्टॅन्डर्ड इ.

लेखकाने मध्ये-मध्ये काही ग्रामीण शब्दांचे अर्थही उलगडून दाखवलेले आहेत. गुडं म्हणजे जवारीच्या कणसासकटच्या पेंढ्या, माग काढणे म्हणजे पायाच्या ठश्यावरून ठरवणे, काळी चामडीवाल किंवा फितवाले म्हणजे पालिस, गेटात म्हणजे पोलिस चौकीमध्ये इ.

दैना कादंबरीचे निवेदन ग्रामीण असून प्रमाणभाषामिश्रीत आहे. एखादा खेडूत आपली कर्मकहाणी ज्याप्रमाणे सांगतो, त्याप्रमाणे त्यांनी आपली व्यथा मांडलेली आहे. कादंबरीचे निवेदन हे प्रथमपुरुषी आहे. भोसले यांनी केलेले निवेदन हे

बाळबोध ग्रामीण भाषेतील असून त्याला शहरीकरणाची छटाही दिसते.'असेल' या शब्दासाठी असन हा शब्द वापरला आहे. 'आणि' या शब्दासाठी आन् किंवा अन् हा शब्द वापरला आहे. काही संवादाच्या सुरूवातीला 'य' हे अक्षर वापरले आहे. उदा- 'य आई म्हणाली, यय माझा लेक हाय बाबा तोय. ययहा गं कोण? य अंधारात आम्ही बहिण भाऊ सारे गडी वाटलो.'

काही प्रसंगावर लेखक तटस्थपणे भाष्य करताना दिसतात. उदा- पोलिसांना लेखकाच्या घरी काही सापडत नाही म्हणून ते फुटके भांडे घेऊन जातात. यावर लेखक भाष्य करतो की, ' काय चोरी पकडली ! वा....!' तसेच गुरूजी वर्गात अपमान करतात. तेव्हा 'रडाय आलं या वांझ जिंदगीवर' तसेच लेखक काही व्यक्तिंची नावे घणे सरळ सरळ टाळतो. उदा- 'त्या माजोऱ्यांची मी नावे घेत नाही.' लेखकाचा प्रांजळपणा अनेक गोष्टींवरून दिसतो. उदा-लेखकाची बहिण गोदाचे प्रेमप्रकरण, आपल्या भावजयीचा चंचलपणा, लहानपणी चोरी केलेल्या अनेक लहान-सहान गोष्टी, स्वत: आपल्या प्रेमप्रकरणाचीही कबुली ते देतात.

लेखकाने निवेदन करत असताना घडलेल्या घटनांचे तपशील सालासह दिलेले आहेत. उदा-'१जानेवारी१९९४ साल उजाडलं', '८१-८२ साली मी तिसरीत होतो,' '१९९५ या वर्षी उरुळीकांचनची निवडणूक झाली,' 'हे २००१ साल होतं. सरकार नोकरभरती करत नव्हतं' अशाप्रकारे सालांचे तपशील दिले गेल्यामुळे त्या त्या कालावधीतील घटनांची माहिती मिळण्यास मदत होते. त्याचबरोबर पारधी जमातीतील अत्याचाराचे घडलेले गुन्हे, तारीख, वार, स्थळांसह तपशीलाने दिले गेले आहेत. उदा-'६-६-२००० औरंगाबाद डिग्गी येथे निळकंठ पोट्या काळे या तरुणाला गोळी घालून ठार केले.' ३०-४-२००० रोजी वाखर. बु. ता. खंडाळा येथील पारधी कुटुंबाला मारहाण करून घरे पेटवली, संसार उध्वस्थ

केले गेले.' (पृ.१७४) अशाप्रकारच्या घटनांची नोंद तपशिलासह लेखकाने दिलेली आहे.

आपली मते पटवून देताना लेखक मंगेश पाडगावकर, म.भा.चव्हाण, भा.रा.तांबे, नां.धों.महानोर, शांताराम नांदगावकर, ज्ञानेश्वर कोळी, इ. थोर कविंच्या कवितांचे स्वामी विवेकानंद यांसारख्या महंतांच्या विचाराचे दाखले देतात. त्याचप्रमाणे 'कावळा बसाय अन् फांदी तुटाय,' 'चोरांच्या उलट्या बोंबा' अशा म्हणींचा वापर, पिक्चरमधील डॉयलॉग देऊन आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना दिसतात.

भोसले यांनी आपल्या पारधी समाजातील व्यवस्थेवर, भ्रष्ट समाजव्यवस्थेवर चीड व्यक्त करताना तिखट भाषा वापरली आहे. उदा -'तिथं तुम्हाला कपडे ठेवायला कपाट पुरत नाही. इथं नेसायला फाटकं लुगडं मिळत नाही आरे काय गरीबी हटावच्या घोषणा करताय?' (पृ.१३१) तसेच ,'आम्ही अजूनही गप्प हा अत्याचार अन्याय अन्याय सहन करतोय की तुमच्या विधानसभेवर भगत सिंगागत आमच्यातल्याने कुणी बांब फेकलेला नाही. तरी तुरुंगातून आमची मढी का बाहेर काढताय.'(पृ.१३२) अशाप्रकारे मनातील उद्रेक ते व्यक्त करतात. हा उद्रेक पारधी जातीला जमातीला प्रेरणादायी असा आहे. कवीमन लाभलेले हे लेखक भ्रष्ट समाजरचेबद्दल या भारतभूमीलाच प्रश्न विचारतात की,

'मते खाणाऱ्यांची पिंड आहे, की गिधाडांची झुंड आहे,
तूच सांग धरणी, तू नक्की कोणाची आहे.' (पृ.१८१)

विद्रोह व्यक्त करताना भोसलेंचे कवीमन जसे डोकावते तसेच निसर्गसौंदर्य न्याहाळतानाही हे कवीमन पुढे झेपावते

उदा-

'हसऱ्या ओठात तुझ्या फुटलीया पहाट निळ्या डोळ्यात
किरीट सजलंया भन्नाट
निळ्या शालूत नववधू सजली जशी दोन्ही ओठात लाली
निसवत गेली कशी
लाजऱ्या दिलात माझ्या ऋतुगंधाने केलीय वाट हसऱ्या
ओठात तुझ्या फुटलीया पहाट'

एकाच प्रसंगातून लेखक अनेक प्रसंगांकडे जातो. त्यातून लेखक जीवनाचा क्रम उलगडत जातो. लेखकाला मुक्या प्राण्यांविषयी वाटणारी सहानुभूती तो जेव्हा हिंस्र लांडग्यावर, खोकडावर, तसेच खिल्लारी गायीविषयी सहजाणिवा व्यक्त करतो तेव्हा दिसून येते. कधी कधी लेखक 'जातीने पारधी, निर्भिड बाणा, कवीमनाची साथ काय हवयं!'असे म्हणून स्वत:विषयी अभिमान बाळगताना दिसतो. तर कधी 'भिकारी आम्ही पैसा कुणाकडं' असे म्हणून स्वत:ला तुच्छ लेखतो. त्याचप्रमाणे एखादा मुद्दा आटोपशीर घेताना, 'असो....,' 'जास्त भलतं सलतं लिहीत नाही' अशाप्रकारची वाक्ये आढळतात.

एकूणच आत्मकथनपर कादंबरी असल्यामुळे लेखकाने आपले सारे जीवन कादंबरीच्या रूपाने आपल्या समोर आणले आहे. या कादंबरीचे 'दैना' हे शीर्षक सार्थ असेच आहे. कारण सगळीकडून लेखकाच्या कुटूंबाची झालेली दैन्यावस्थाच येथे आपणास दिसून येते.आणि स्वत: लेखकही कादंबरीला हे शीर्षक देण्यामागचे कारण सांगतात की, त्यांच्या या अवस्थेला त्यांची आई पारधी भाषेमध्ये 'दानादीन' म्हणायची व या शब्दावरून त्यांना हे नाव सुचले. आणि 'दैना' हे या कादंबरीचे नामकरण केले गेले.

**निष्कर्ष :-**

१. 'वकिल्या पारधी' कादंबरीत अवतरलेला पारधी समाज त्याचप्रमाणे एकूणच आदिवासी, ग्रामीण आणि शहरी समाज, त्यांचे राहणीमान आणि प्रत्येक समाजाची विचारसरणी उत्तमरित्या अवतरलेली आहे.

२. 'वकिल्या पारधी' मध्ये पारधी जमातीवर होणाऱ्या अत्याचाराच्या अनुशंगाने एकूणच भटक्या-विमुक्त जमातीविषयी पोलिसांच्या मनातील संशयीत वातावरण, स्वार्थांधी पोलिसवृत्ती, भ्रष्टलेले पोलिस आणि त्यांना दुजोरा देणारे गावकरी आणि सवर्ण लोक यातून पूर्वग्रहदूषित समाजव्यवस्थेचे दर्शन घडते.

३. 'दैना' या कादंबरीतही पारधी लोकांची पांढरपेशा लोकांकडून झालेल्या अवहेलनेचे, मागासलेल्या पारधी लोकांच्या अंधश्रद्धेचे आणि त्यातून उद्भवलेल्या समस्यमुळे आणखीनच गुरफटलेल्या व त्यातून बाहेर पडू पाहणाऱ्या या पारधी समाजातील लोकांचे चित्रण आले आहे.

४. 'दैना' कादंबरीतील समाजचित्रण, त्यामधील विचारप्रवृत्त करणारे अनेक सामाजिक प्रश्न, धनाच्या आशेने स्त्रीकडे पाहण्याची वृत्ती आणि त्यामुळे ढासळलेली नैतिकता आणि पोकळ समाजव्यवस्थेचे दर्शन घडते.

५. 'वकिल्या पारधी' व 'दैना' या दोन्ही कादंबऱ्या पारधी समाजजीवनावर आधारित असून 'वकिल्या पारधी' मध्ये लेखकाची नागरी व सुबक शैली आणि 'दैना' मध्ये लेखकाची ग्रामीण व रांगडी शैली आपापल्या जाणिवांची व अनुभवांची प्रचिती देते.

६. 'वकिल्या पारधी' व 'दैना' या कादंबऱ्या वाङ्मयीनदृष्ट्या महत्त्वाच्या असून यातून त्या जमातींचे अनुभव, अज्ञान, स्वभाव, प्रांजळपणाण आणि लेखकाची शैली नजरेत भरते.

संदर्भ :-

१. डॉ. सदा कऱ्हाडे, सामाजिक शास्त्रे आणि साहित्य ; अंत:संबंध प्रा. डॉ. ह. श्री. साने, पुणे, पृ.१००१